
# होयसळांच्या मयसभा

## बेलूर आणि हळेबिडू




अद्वैत प्र. करजगी

होयसळांच्या मयसभा - बेलूर आणि हळेबिडू

लेखक: अद्वैत करजगी
पुणे, महाराष्ट्र, भारत
https://drifteradwait.com/
इ मेल: adwait.karajagi@gmail.com
छायाचित्रे:अद्वैत करजगी, अमृता क्षीरसागर

या पुस्तकातील लेखनाचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण, किंवा इतर रूपांतरण करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकतो. सदर मजकुराचा अथवा छायाचित्रांचा अंशतः अथवा पूर्णतः वापर करण्याआधी लेखकाची परवानगी आवश्यक आहे.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognized even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

पुराणातील मनोरंजक अन उद्बोधक कथा, मूर्तिशास्त्रे आणि प्रवास वर्णने व त्यांची छायाचित्रे बघण्यासाठी आमच्या drifteradwait.com ह्या संकेतस्थळास जरूर भेट द्या.

**लेखकाविषयी थोडेसे :**
लेखक सर्वात महान अश्या पुण्यनगरीचे रहिवासी असून गर्दीत भेटल्यास तुम्ही तुमचे पाकीट चापचपून जागेवर आहे ना ह्याची खात्री कराल अश्या तेजपुंज व्यक्तिमत्वाचे आहेत. कोणत्यातरी वर्षी बी.फार्म (एकदाचे) होऊन लेखकाला भारतापासून दूर अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी धाडण्यात आले. काही वर्षांनी नामांकित विद्यापीठातून मास्टर्स इन हेल्थकेयर ऍडमिनिस्ट्रेशन च्या पदवीचे भेंडोळे त्यांना सोपोवण्यात आले. अमेरिकन लोकांना सर्वकाही शिकवून झाल्यावर, आणि सर्व पैसे प्रवासात उडवून झाल्यावर लेखक महाशय मायदेशी परतले आणि कॉर्पोरेट चाकरीत रममाण झाले. बऱ्याच (म्हणजे एक) मल्टी नॅशनल कंपन्यांचा दांडगा मॅनेजमेंट अनुभव गाठीशी बांधत असताना महाशयांना लेखनाचा किडा चावला आणि त्यांनी driferadwait.com नावाचा ब्लॉग सुरु केला. त्यातूनच पुढे आवड निर्माण होऊन कॉर्पोरेट नोकरी सोडून महाशय पूर्णवेळ लेखक बनले आणि परत अमेरिकेच्याच एका कंपणी साठी बोरू झिजवू लागले.

लेखकास विचित्र प्राणी पाळणे, डोळे दुखेस्तोवर टीव्ही बघणे, व्यायाम शाळेत जाऊन व्यायामाच्या गप्पा झोडणे, लायब्ररीत चकाट्या पिटणे अश्या बऱ्याच गोष्टींची आवड आहे. लेखक ऋणं कृत्वा घृतं पिबेत् (म्हणजेच कर्ज काढून तूप प्या, मजेसाठी हरएक उपाय अवलंबावा) ह्या चार्वाक वचनाचे अतिशय खंदे समर्थक असून प्रवास खर्च भागवण्यासाठी लेखकाने एकेकाळी अमेरिकी हॉटेलातून सुद्धा काम केलेले आहे. लेखकाने एकट्याने सायकल वर नर्मदा परिक्रमा पूर्ण केलेली आहे, आणि त्यात बराचसा वाटा मय्याचा आहे. लेखक उणे पंचवीस तापमानाच्या येल्लो स्टोन नॅशनल पार्क आणि पन्नास डिग्री सेल्सियस च्या ग्रँड कॅन्यन मध्ये राहून आलेले, तरीही दगडाप्रमाणे काहीच फरक न पडलेले आहेत. अमेझॉन (ब्राझील) च्या जंगलात राहण्याचा अनुभव असला तरी तिकडील प्राण्यांसाठी हा फारसा आनंददायी अनुभव न्हवता असे तिकडच्याच काही प्राण्यांचे म्हणणे आहे. ऍक्सेस १२५ वर बायकोच्या मागे बसून (जीव मुठीत घेऊन) कर्नाटक फिरता फिरता लेखकाला मंदिरे आणि मूर्तिशास्त्राचे वेड लागले असून सध्या ते ह्याविषयीचे लेखन अधून मधून लहर येईल तसे करत असतात. इतक्या महान मनुष्याची माहिती भारताला नसावी ह्यात भारताचे दुर्दैव सामावले आहे.

लेखक हे पुस्तक त्याच्या नाईलाज असलेल्या बायकोस, हात टेकलेल्या पालकांस, आणि महाराष्ट्राच्या मातीस अर्पण करीत आहे.

ಬಾಗಿಲೊಳು ಕೈ ಮುಗಿದು
ಒಳಗೆ ಬಾ ಯಾತ್ರಿಕನೆ
ಶಿಲೆಯಲ್ಲವೀ ಗುಡಿಯು
ಕಲೆಯ ಬಲೆಯು!





हे फिरस्त्या, ओठांवर प्रार्थनेचे शब्द आणून
अन हात जोडून नम्रतेने आत पाऊल टाक,
कारण,
हे नाही केवळ निर्जीव दगडांनी बनलेले राऊळ,
तर आहे कलेचे विस्मयकारक आश्चर्य!

-केवेम्पू

(ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवीश्रेष्ठ
कुप्पलि वेंकटप्पा पुट्टप्पा)

# अनुक्रमणिका

मनोगत..........................................................................६
कोण होते होयसळा? ........................................................९
होयसळ (वेसर) स्थापत्यशैली...........................................१४
चेन्नकेशव मंदिराचा इतिहास.............................................१९
मंदिर प्रवेश......................................................................२२
थोडेसे मंदिराविषयी........................................................२४
द्वारशाखा आणि मकर तोरण...........................................२७
बाह्यदर्शन........................................................................२९
उग्र नृसिंह २९ / गजासुर संहार ३० / हरिहर ३२ / सूर्य ३३ / दक्ष ३४ / भीम भगदत्त ३५
होयसळांच्या सुरसुंदरी.....................................................३६
मंदिराचे अंतर्दर्शन.........................................................४५
वितान ४५ / मंदिराचे स्तंभ ४८ / मंदिराचे गर्भगृह ५१ / मकर तोरण ५२
प्रांगणातील इतर काही इमारती .........................................५५
होयसळेश्वर मंदिराचा इतिहास.........................................५९
मंदिर रचना......................................................................६२
मंदिराचे थर......................................................................६७
बाह्यदर्शन........................................................................६९
दक्षिण द्वार ६९ / गणेश व कार्तिकेय ७१ / गौरीशंकर ७३ / त्रिमूर्ती ७४ / मुरलीधर ७६
गोवर्धन गिरिधारी ७७ / गजासुर संहार ७९ / द्वादशभुज वराह ८१
उग्र नृसिंह ८२ / वामन आणि त्रिविक्रम ८४ /
कृष्ण इंद्र पारिजात संग्राम ८७ / अंधकासुर वध ८९ / रावणानुग्रह ९३ / कीर्तिमुख १०० / पुरातत्व संग्रहालय १०१ /
मंदिरे म्हणजे केवळ प्रार्थनास्थळेच होती का? १०५
हळेबिडू परिसर............................................................१०८

# मनोगत



असे मानले जाते की जगातील सगळ्याच देशांना भूगोल असतो, पण फारच थोडे देश असे असतात ज्यांना दहा हजार वर्षांपेक्षा जुना इतिहास लाभलेला असतो. आपण नशीबवान, कारण जगातील अश्या मोजक्या देशांपैकी एक असलेल्या भारत भूमीत आपण जन्माला आलोय. केवळ आपलीच नाहीत, तर बाहेरची संग्रहालये सुद्धा आपल्या देशातील कलाकृतींनी ओसंडून वहात असतात. इथे शेकडो प्रबळ सत्ता उदयास आल्या, त्यांनी एकमेकांशी भयंकर लढाया करून राज्यविस्तार केला, आणि कालांतराने त्या सत्ता, त्यांचे राज्य, त्यातील महापराक्रमी राजे, त्यांच्या चतुरंग सेना काळाच्या उदरात गडप झाल्या. त्यातील अगदी थोड्या सत्तांविषयी आपल्याला थोडेफार माहित असते, आणि बहुतकरून उरलेल्या सत्तांची गंध वार्ताही नसते. त्यांच्या खाणाखुणा त्यांनी बांधलेले किल्ले, मंदिरे, स्थापत्य शास्त्र, ग्रंथ ह्यात तग धरून आठवणींची उब तेवत ठेवत असतात.

तुम्ही थोडेसे डोळस  भटकंती करणाऱ्यातील असाल, आणि दक्षिण व उत्तर भारतात प्रवास केलेले असाल, तर ह्या दोन भागातला एक प्रमुख फरक तुम्हाला जाणवतो, आणि तो म्हणजे दक्षिणेकडील शाबूत राहिलेली मंदिरे, आणि हजारो वर्षांपासुन चालू असलेली अखंडित उपासना पद्धती, जी उत्तर भारतात फार क्वचित बघावयास मिळते. त्याचे कारण म्हणजे वायव्येकडून इस्लामी आक्रमणाच्या पाशवी वरवंट्याखाली उत्तर भारतीय हिंदू सत्ता भरडल्या गेल्या. परंतु यादव, चालुक्य, चोल, पांड्य, काकतीय, विजयनगर आणि आपण, म्हणजे मराठे ह्या सर्वांनी ह्या रानटी आक्रमणाला अटकाव घालण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. ह्या प्रयत्नात बऱ्याच हिंदू सत्ता नामशेष सुद्धा झाल्या. परंतु हर घडीला त्यांची जागा घेण्यास एका मागून एक समर्थ नेतृत्व दंड थोपटून, बाह्या सरसावून उभे ठाकले, अन् त्याचा परिपाक म्हणजे दक्षिणेत काही प्रमाणात शाबूत राहिलेली संस्कृती, मंदिरे आणि हिंदू उपासना पद्धती. ज्या सत्तांनी हिरव्या लाटेला बांध घालायचे काम केले त्यातील एक महत्त्वाची सत्ता म्हणजे होयसळा.

परंतु होयसळांचे महत्त्व केवळ इतकेच मर्यादित नाही. साडे तीनशे वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी भारताच्या कला आणि संस्कृतीक जडण घडणीत मोलाची भर घातली. दानधर्म केला, पुष्करिणी खोदल्या, पंथांना एकत्र आणले, आणि विश्वकर्म्यालाही आश्चर्य वाटावे अशी मंदिर स्थापत्य शैली विकसित केली. त्यांनी ज्या शैलीत ही शेकडो मंदिरे घडवली, ती आज आपण वेसर स्थापत्य शैली म्हणून ओळखतो. तशी त्यांनी बांधलेल्यापैकी बरीच मंदिरे आजही ऊन पावसाच्या माऱ्याला तोंड देत अगदी समर्थ पणे उभी आहेत. ह्याच शैलीचा परमोच्च बिंदू म्हणजे बेलूर चे चेन्नकेशव आणि हळेबिडू चे होयसळेश्वर मंदिर.



एकूणच दक्षिण भारत म्हणजे मंदिरांची रेलचेल, अन् त्यात कर्नाटक देश म्हणजे जमिनीवर गारा पडाव्यात तशी ठिकठिकाणी सापडणारी जुनी देवळे. भटक्यांची पंढरी हंपी इथेच, बदामी इथलीच आणि कोण्या महाप्रचंड राक्षसाने एकमेकांवर काळजीपूर्वक रचलेले भले मोठे प्रस्तर आणि त्यावर बांधलेले रखरखीत रांगडे किल्ले सुद्धा इथलेच.

आपण महाराष्ट्रीय मंडळी उत्तर कर्नाटकात सहलीसाठी येतो, अन दक्षिण कर्नाटक, म्हणजेच बेंगळुरू मध्ये उपजीविकेसाठी. बेंगळुरू वरून जवळ असलेल्या होयसळांच्या राजधान्या बेलूर आणि हळेबिडू आपल्या नजरेतून निसटतात त्या त्यामुळेच. म्हणून जोडून सुट्ट्या आल्या (म्हणजेच मराठीत लॉन्ग विकेंड मिळाला) तर गाडीत बसावे आणि सरळ बेंगळुरू वरून दोनशे किमी वरचे बेलूर गाठावे.

कोणताही ऋतू असो, चांगले दोन तीन दिवस मनसोक्त मंदिरे पाहण्यात घालवावेत आणि मग परत बेंगळुरू जवळ करावे. तुम्ही जर मंदिर स्थापत्य कलेचे अभ्यासक असाल, तर तुमच्यासाठी ही भटकंती म्हणजे अक्षरशः मेजवानीच. आणि जर नसाल, तरीही आपल्या पूर्वजांची अत्यंत नाजूक आणि कल्पनारम्य अशी कलाकुसर बघून, तुमचे डोळे निवतील, छाती गर्वाने फुगेल, आपल्या परंपरेची नव्यानेच ओळख होईल अन् तुमचा वेळ आणि भटकंती सत्कारणी लागल्याचे समाधान मिळेल. ह्या पुस्तकाचा घाट त्यासाठीच.

## कोण होते होयसळा?

आपल्याकडे जेव्हा ससा लांडग्यांचा पाठलाग करतो, तेव्हा तिथे किल्ला बांधला जातो. एखाद्या गाईने जंगलातील वारुळावर दुधाचा अभिषेक करायला सुरवात केली, की तिथे एखादी पिंड किंवा पुरातन मूर्ती सापडून त्याभोवती मंदिर बांधले गेलेच म्हणून समजावे. फार काय, पांडव किंवा प्रभू राम, लक्ष्मण आणि सीतामाई त्यांच्या वनवासात एका रात्रीत बरीच मंदिरे बांधते झाले आहेत. तश्याच काहीश्या मनोरंजक दंतकथा आपल्याला भारतातील जी महान राजघराणी होऊन गेली, त्यांच्याबद्दल ऐकायला मिळतात. तशीच ही एक गोष्ट.

अंगदी नावाच्या कोण्या एका छोट्याश्या खेड्यात वासंतिका देवीचे देऊळ होते. देवळाला लागूनच जैन मुनी सुदत्त ह्यांचा आश्रम होता. त्या काळी भारतात कॉन्व्हेंट शाळा नसून विद्यार्थी गुरुकुलात आपले जाती, सामाजिक स्थान, पैसे, मानमरातब आणि इतर भेद विसरून एकत्र येऊन शिकत असत. एके दिवशी गुरु शिकवत असताना अचानक एक भयंकर सिंह आश्रमात आला आणि क्रुद्ध होऊन डरकाळ्या फोडू लागला. ते पाहून सगळे विद्यार्थी सैरावैरा पळू लागले. इतक्यात एक उडी घेऊन तो सिंह गुरूच्या समोरच आला. जराही विचलित न झालेल्या सुदत्त गुरुजींच्या तोंडून बाहेर पडले, " होय, सळा". जुन्या कानडीत ‘होय’ चा अर्थ मार. त्यांनी त्यांच्या सळा नावाच्या विद्यार्थ्याला आज्ञा केली, की सळा, मार ह्याला. ते बघून शूर सळा तलवार घेऊन पुढे आला आणि त्याने त्या भयंकर प्राण्याशी झुंज मांडून त्याला ठार मारले. तेव्हापासून तो शूर मुलगा आणि त्याच्या येणाऱ्या पिढ्या होयसळा नावाने प्रसिद्ध झाल्या. आख्यायिका बाजूला ठेवा, पण सिंहाशी झुंज घेणारा सळा हे मात्र होयसळांचे राजचिन्ह होते हे मात्र खरे.



सळा आणि सिंह, होयसळांचे राजचिन्ह, चेन्नकेशव मंदिर, बेलूर

दंतकथेच्या जगातून आता आपण येउयात इतिहासात. दहाव्या शतकाचा काळ दक्षिण भारतासाठी मोठ्या धामधुमीचा होता. तुंगभद्रेच्या उत्तरेस मुख्यत्वे प्रबळ राष्ट्रकूटांचे राज्य होते. चोळांचा किंवा गंगांचा मुलुख काबीज करण्यास ते क्वचित तुंगभद्रा ओलांडून दक्षिणेत येत असत. कृष्णेच्या सभोवताली कल्याणीचे चालुक्य मोठेच बलशाली होऊन बसले होते. त्यावेळी गंगा राजवंशाची राजधानी तळकडू असून त्यांचे राज्य तत्कालीन कोलार, मंड्या आणि म्हैसूर पर्यंत पसरले होते. शेवटी राष्ट्रकूट, चालुक्य आणि चोळांच्या रेट्यापुढे कसेबसे तग धरून राहिलेले गंगा साम्राज्य कोसळले आणि त्या भागात एक राजनैतिक पोकळी निर्माण झाली, जी होयसळ नावाच्या घराण्याने भरून काढली.

आताचे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या चिकमंगळूर च्या जवळ असलेल्या मुदगेरे तालुक्यातील सोसेयुर नावाच्या गावाहून ते आले होते. चालुक्यांच्या अधिपत्याखाली अवघ्या काही दशकांत ते अगदी बेलूर पर्यंत मुसंडी मारते झाले. सळाचे शूर वंशज असलेले विनयदित्य आणि एरेयांग ह्या होयसळ सरदारांनी चालुक्यांच्या सेनेबरोबर लढून आसपासच्या शिरजोर होऊ पाहणाऱ्या सामंतांना धुळीस मिळवले. अगदी महाराष्ट्रातील यादव आणि माळव्यातील परमार राजांची आक्रमणे परतवण्यासाठी चालुक्यांबरोबर खांद्याला खांदा लावून लढाया केल्या आणि चालुक्य राजांची खाशा मर्जी संपादित केली.

अकराव्या शतकाच्या मध्यात राजा विनयदित्याने एक महाप्रचंड सरोवर खोदले, ज्याला 'समुद्र' असे नाव देण्यात आले. ह्या प्रचंड जलाशया भोवताली त्याने एक शहर वसवले जे द्वारसमुद्र म्हणून नावाजले जाऊ लागले. शतकाच्या पूर्वार्धात लढाया करून, आणि काही स्वतंत्र नायकांना (सामंतांना) आपल्या बाजूस वळवून होयसळ घराणे एक समर्थ सत्ता केंद्र बनले. ह्या काळात चालुक्यांच्या साम्राज्याला घरघर लागली होती. ह्या संधीचा फायदा घेत राजा विष्णुवर्धनाने (११०८ ते ११५२) आपले सार्वभौमत्व जाहीर केले, आणि तो प्रथम होयसळ अधिपती झाला.

होयसळांचा पहिला नायक म्हणून अरेकाला चा उल्लेख इसवी सन ९५० मध्ये येतो. त्यानंतर मरुगा, नृपकाम असे होयसळा सरदार इतिहासातून डोकावतात. जहागिरीचे सार्वभौम राज्यात रूपांतर करणारा विष्णुवर्धन (११०८-११५२), नरसिंह (११५२-११७३), आणि वीर बल्लाळ दुसरा (११७३-१२२०) ह्यांच्या अथक प्रयत्नांनी होयसळ राज्याचे होयसळ साम्राज्यात रूपांतर झाले. वीर बल्लाळ दुसरा ह्याने पांड्य राजांचा पराभव केला आणि दक्षिण चक्रवर्ती असे बिरुद मोठ्या दिमाखाने धारण केले. एका लोककथे नुसार त्यानेच बंगळूर शहराची वेस घातली आणि शहर स्थापन केले. आता त्यांचे साम्राज्य दक्षिण महाराष्ट्रापासून ते अगदी रामेश्वर पर्यंत जाऊन टेकले होते.

नरसिंह आणि वीर बल्लाळ दुसरा ह्यांच्या काळात राजाश्रयाने असंख्य विहिरी, जलाशय आणि पुष्करिणी खोदल्या गेल्या. कालव्याचे एक विस्तृत जाळेच ह्या राजांनी जमिनीवर पसरवले, ज्याचा परिपाक न भूतो न भविष्यती अश्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संपन्नतेत झाला. देवगिरीचे यादव, द्वारसमुद्राचे होयसळा, वारंगळ चे काकतीय, चोळ, पांड्य, चालुक्य ह्यांनी दक्षिण भारत हे जणू आशिया खंडाचे सांस्कृतिक केंद्र बनवून ठेवले.

संपन्नता आली की प्रजाजन सुखावतात. पण संपन्नता आली, की मग येतात गिधाडं. १२९६ मध्ये स्वतः ला यदुवंशी म्हणवून घेणाऱ्या देवगिरीच्या यादवांनी अल्लाउद्दीन खिलजी समोर शरणागती पत्करली, आणि भलीमोठी खंडणी आणि महाराष्ट्राची लाज दिल्लीच्या वेशीवर टांगली गेली. काही वर्षातच महाराष्ट्रीय अस्मितेने पुन्हा भरारी घेतली आणि आर्थिक खंडणीचा ओघ बंद पाडला. मग मात्र दिल्लिश्वर खीलजीचा पिसाट सेवक मलिक कफुर हजारदिनारी हा ससैन्य दक्खनेत दाखल झाला, आणि आपापसातील लढायांत व्यस्त असलेले राजे, महाराजे, अधिपती त्या कडव्या जिहादी रेट्यासमोर सपशेल आडवे झाले.

१३०८ मध्ये त्याने देवगिरी नेस्तनाबूत करून टाकली. पण आता जनावराच्या तोंडास रक्त लागले होते. दोनच वर्षांनी परत येऊन खिलजी ने १३१० मध्ये काकातिय राज्याचा उच्छेद केला, आणि घोड्यांना जराही विश्रांती न देता १३११ च्या अखेरीस त्याने होयसळांची राजधानी द्वारसमुद्रवर आपले हिरवे डोळे वटारले. तुरळक चकमकीनंतर काही दिवसातच वीर बल्लाळ तिसरा ह्याने सपशेल शरणागती पत्करली. इतकेच नाही, तर काही इतिहासकारांच्या मतानुसार तत्कालीन होयसळ राजाने मलिक काफूर बरोबर वाटाघाटी करून, त्याला आपले हत्ती, घोडे आणि सैन्य देऊन पांड्य राजांवर आक्रमणासाठी मदतच केली. स्वतः ची कातडी बचावण्यासाठी देशबांधवांशी केलेला केवढा मोठा द्रोह हा? ह्या आप्तद्रोहाची मोठी किंमत पुढे मोजायला लागली होयसळांच्या देवळांना.

शरणागताला अभय देणे ही मनुष्य प्रवृत्ती. सैतानी सत्तांना हा नियम लागू होत नाही. शरण येऊनही सुंदर राजधानी यथावकाश लुटली गेलीच. नितांत सुंदर देवळे ओरबाडली गेली. धर्मस्थाने बाटवली गेली. मूर्तिकारांनी अवघे आयुष्य वेचून, प्राण ओतून घडवलेल्या मूर्तींच्या बुतशिकनांकडून ठिकऱ्या उडवल्या गेल्या. राजवाड्याचा मागमूसही ठेवला गेला नाही.

टोळधाड येऊन गेल्यानंतर राजाने मंदिरे पुन्हा बांधण्याचा, आणि गेलेली प्रतिष्ठा परत मिळवण्याचा प्रयत्न केला, पण तोपर्यंत मुहम्मद तुघलक नावाचा सैतान दिल्लीवर अंमल करता झाला होता, आणि त्याची नवी भूक त्याला स्वस्थ बसू देईना. दहा वर्षांनी तो सुद्धा बेलूर आणि द्वारसमुद्र ह्या सुंदर शहरांपर्यंत पोचला, आणि त्याने ही दोन सुंदर शहरे पुरती नागवली. राजधानी द्वारसमुद्र अताशा हळेबिडू, म्हणजेच जुने शहर अथवा भग्न शहर ह्या नावाने ओळखले जाऊ लागले होते.


१३४० मध्ये नवा होयसळ राजा बल्लाळ चौथा ह्याला तामिळ देशात परागंदा व्हावे लागले. तिरुवन्नामलई येथे तो उरलेले राज्य सांभाळू लागला. १३४६ मध्ये मदुरै च्या इस्लामी सरदाराबरोबर च्या लढाईत तो मारला गेला, आणि एक महापराक्रमी राजवंश इथेच संपला. परंतु हिंदू प्रतिकार इथेच संपला नाही. होयसळांची पीछेहाट होत असताना काही नव्या शक्ती जन्म घेत होत्या. असे मानले जाते की होयसळ राजा बल्लाळ तिसरा, ह्याचा बल्लप्पा दंडनायक नावाचा पुतण्या होता. त्याच्या मुलीचे लग्न हरिहर नावाच्या एका शूर तरुणाशी झाले. त्या विजिगिषु तरुणाने इस्लामी आक्रमण कर्त्यांकडून आपला प्रदेश परत मिळवायला सुरवात केली. होयसळा काळाच्या उदरात गडप होत असतानाच, त्याने आपले सार्वभौमत्व जाहीर करत तुंगभद्रेच्या काठी आणेगुंदी येथे राजधानीचे नगर उभे केले. ज्याला आज आपण म्हणतो - विजयनगर साम्राज्य.

# वेसर (होयसळ) स्थापत्यशैली



होयसळ वेसर स्थापत्यशैलीची अनेक वेगळी वैशिष्ट्ये आपणास दिसतात. त्यांपैकी व्यवच्छेदक लक्षणे म्हणजे जलाशयाच्या सन्निध असलेली मंदिरे. जवळपास हर एक होयसळांचे मंदिराशेजारी आपल्याला तलाव सापडतो. ह्यांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे पीठ (जगती) वर उभे केलेले मंदिर व प्रदक्षिणामार्ग. मंदिराच्या चौथऱ्यावर चढून आपण जेव्हा मंदिराची प्रदक्षिणा करतो तेव्हा शेकडो पौराणिक घटना आपल्याशी बोलू लागतात. आपल्या मनी भक्तिभाव उत्पन्न करतात. गर्भगृहातील देवाचे दर्शन होण्याआधी आपल्याला त्याची निरनिराळी सगुण रूपे दिसतात, त्यातून आपल्याला देवाच्या लीलांचे, अनादी अनंत स्वरूपाचे दर्शन होत असते. म्हणूनच गाभाऱ्यातील दर्शनासोबत होयसळांनी बहिर्दर्शनास सुद्धा तितकेच महत्त्व दिले.

वेसर शैलीचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे अधिष्ठान आणि मंडोवराचा (मंदिराची बाह्यभिंत) कंगोरेबद्ध तलविन्यास (लेआऊट). आपली कला जगासमोर आणण्यास जणू होयसळा कारागिरांची चढाओढच लागली असावी. चौकोनी अथवा षट्कोनी मंडोवराचा कॅनव्हास कमी पडू लागला असावा. म्हणूनच की काय बेलूर आणि हळेबिडू च्या बाहेरच्या भिंतींना असंख्य कंगोरे केले गेले, जेणेकरून अधिकाधिक शिल्पे घडवता येतील.



मंदिराचे विविध थर आणि खिडक्या (जाली)

बेलूर आणि हळेबिडू येथील देवळांचा हर एक बारीक सारीक कंगोरा अप्रतिम अश्या शिल्पकलेने मढलेला आहे. गजथर, अश्वथर, मकर थर, पुष्प थर, नर थर, आणि त्यावर पौराणिक कथा चित्रित केलेला थर असे बरेच थर आपल्याला होयसळांच्या बाह्य भिंतींवर दिसतात. होयसळांचे मंदिर स्थापत्य कलेतील आणखी एक योगदान म्हणजे गर्भगृहावरील शिखरे. होयसळांच्या देवळात बऱ्याचदा एकापेक्षा जास्त गर्भगृहे असायची. जितकी गर्भगृहे, तितके कळस (कूट). म्हणूनच वेसर शैलीत एककूट, द्विकूट, त्रिकुट, चतुश्कूट अथवा पंचकुट शिखरांची मंदिरे बांधली गेली.

जेव्हा तुम्ही मंदिराच्या उपमंडपात प्रवेश करता तेव्हा तुम्हाला दिसतात काळे कुळकुळीत खांब. काही खांब अत्यंत नाजूक, आणि बोट कापणाऱ्या धारदार कंगोऱ्यांनी मढलेले असतात, तर काही घासून पुसून इतके गुळगुळीत, की तुम्ही त्यात आपले प्रतिबिंब पाहू शकता. त्या काळी लेथ मशीन, किंवा पॉलिश पेपर चा मागमूस नसताना हे खांब इतके गुळगुळीत कसे केले असतील ह्याचे उत्तर खांबावरच्या आपल्याच प्रतिमेला आपण विचारतो. होयसळांची अजून एक खासियत म्हणजे अत्यंत बारीक कलाकुसर असलेले वितान (आतील छत). मंडपातील रंगशिळेवरच्या वितानावर तर अप्रतिम कलाकुसर असतेच, परंतु होयसळांच्या मंदिरांच्या उपमंडपाचे छत सुद्धा आकर्षक असते. लोलक, उलट्या कमळांच्या उमलत जाणाऱ्या विविध स्थिती ह्यांचे अंकन ह्या छतांवर असते. या अश्या वर्तुळाकार वितानाच्या भोवती बऱ्याचदा अष्ट दिगपाल, किंवा वादक आणि गायकांचा वेढा असतो.



होयसळांच्या मंदिरांचे तुम्हा आम्हा सामान्य जनांना भावणारे वैशिष्ट्य म्हणजे मंदिराच्या आत बाहेरील अत्यंत नाजूक कलाकृती. अत्याधुनीक साधने हाताशी नसताना केवळ छिन्नी हातोडीने ह्या मंडळींनी इतके नाजूक कोरीवकाम कसे केले असेल? ह्याचे उत्तर आपल्याला सापडते त्यांनी बांधकामासाठी वापरलेल्या दगडात.



होयसळांनी त्याच्या बांधकामात सोप स्टोन (टॅल्कक्लोरिक शिस्ट) चा वापर केला. ह्या सोप स्टोन मध्ये टॅल्क चे प्रमाण बाकी दगडांच्या तुलनेत जास्त असते. त्यामुळे हा दगड कोरीवकामासाठी नाजूक किंवा तुलनेने मऊ समजला जातो. परंतु त्याचबरोबर हा दगड मजबूत, टिकाऊ आणि अग्निरोधक असतो. ह्या कारणांमुळेच होयसळांनी हा दगड बांधकामांमध्ये मुक्तहस्ते वापरला आणि आश्चर्याने तोंडात बोटे घालायला लावणाऱ्या कल्पनातीत कलाकृती निर्माण केल्या.

त्या काळी मंदिर बांधणे म्हणजे केवळ राजाची जबाबदारी नसावी. स्थपती, शिल्पी, सोनार, हस्तिदंत कारागीर, चित्रकार, सुतार ह्या सगळ्यांच्या सहभागाने ह्या वास्तू उभ्या रहात असत. होयसळांचे वेगळेपण असे, की काही मूर्तींच्या खाली शिल्पीची, त्याच्या गावाची, घराण्याची माहिती कोरलेली दिसते. चालुक्यांच्या कडे कामाचा अनुभव असलेला, टुमकुर गावचा रहिवासी जक्कण्णाचारी हा त्यांच्याकडे कामाला होता. त्याच्या प्रतिभेला नमन म्हणून विष्णूवर्धन राजाने 'अमरशिल्पी' ही पदवी त्यास प्रदान केली होती. कर्नाटक सरकार कडून प्रतिभावान कारागीर आणि शिल्पीनां जो प्रतिष्ठेचा पुरस्कार दिला जातो, त्याचे नाव 'अमरशिल्पी जक्कण्णाचारी पुरस्कार' ठेऊन शासनाने ह्या महान शिल्पीची आठवण आजही जिवंत ठेवलेली आहे.

सोमनाथपुर चे प्रसिद्ध केशवाचे मंदिर बांधले होते रुवरी मलितम्मा ह्या प्रसिद्ध स्थपतीने. मंदिर बांधणी बरोबरच मलितम्मा हा मूर्तींच्या बारीक कलाकुसरीचे दागिने घडवण्यासाठी प्रसिद्ध होता. त्याला तब्बल सहा दशकांचा मूर्ती घडवण्याचा अनुभव होता असा मजकूर काही मुर्तीं खाली वाचावयास मिळतो. बल्लीगावी चे दसोजा व त्याचा मुलगा चवण हे बेलूर च्या चेन्नकेशव मंदिराचे तर केदारोजा हळेबिडू च्या होयसळेश्वर मंदिराचे प्रमुख स्थपती होते. त्यांचे नाव अजूनही बऱ्याच मंदिरांमध्ये आपणास वाचायला मिळते. त्याचबरोबर नादोजा, मललोजा, बैकोजा, कौडाय, नंजया, मारिदम्मा, बामा, असे खूप मूर्तिकार आणि स्थपती आपल्याला शिलालेखांतून भेटतात. ह्या जाणत्या लोकांकडे दगडांमधून स्वर्ग उभे करण्याचे कसब होते. आपली आयुष्य वेचून त्यांनी ह्या मूर्ती घडवल्या, ज्या आठशे वर्षांनंतरही आपल्याला स्तिमित करत आहेत.



होयसळ योद्धे,
सोमनाथपूर

# चेन्नकेशव मंदिराचा इतिहास

पैर है तो हंपी आओ, आँखे है तो बेलूर जाओ.
ह्या मंदिराची नाजूक कलाकुसर, भव्यता, त्याचा इतिहास, इंचा इंचावरची सौंदर्यस्थळे आपल्याला अक्षरशः खिळवून ठेवतात. एकाच वेळेस 'हे आजपर्यंत आपण कसे पहिले नाही' म्हणून आपण स्वतः ला बोल सुद्धा लावतो, आणि त्याच वेळेस 'बरे झाले आणि वाट वाकडी करून आपण इथे आलो' म्हणून स्वतःस शाबासकी सुद्धा देतो असा मंदिर स्थापत्यशास्त्रातील चमत्कार म्हणजे चेन्नकेशव मंदिर. नागर, भूमिज, वेसर, द्राविड अश्या अनेक मंदिर स्थापत्य शैलीचा अद्भुत संगम म्हणजे चेन्नकेशव मंदिर. जगात खूप कमी गोष्टी अश्या असतात ज्याने आपल्याला डोळे असल्याचे सार्थक वाटते. त्या गोष्टींपैकी एक म्हणजे बेलूर चे चेन्नकेशव मंदिर.

कानडीत चेन्न म्हणजे देखणा, साजिरा, सुंदर. आता अश्या देखण्या देवाचे घर सुद्धा त्याला शोभेल असेच देखणे झाले पाहिजे, नाही का? नावास शोभून दिसणाऱ्या चेन्नकेशव मंदिराचे बांधकाम १११७ मध्ये राजा विष्णूवर्धन (पहिला) ह्याने सुरु केले. ह्याचा उल्लेख आपल्याला देवळाच्या उत्तरेकडील दरवाजावर मिळणाऱ्या शिलालेखात सापडतो. तीन पिढ्या आणि १०३ वर्षांनंतर, स्थपतींच्या, शिल्पीच्या अनेक पिढ्यांच्या अथक प्रयत्नातून हे मंदिर उभे राहिले. ह्या स्थळाचा महिमा असा, की शिलालेखात ह्याचे कवतिक भूलोकीचे वैकुंठ, अथवा दक्षिण वाराणसी असेच. कथांप्रमाणे विष्णूवर्धन आधी जैन धर्माचा अनुयायी होता. धर्मगुरू रामानुजाचार्य ह्यांनी राजास वैष्णव धर्माची दीक्षा दिली. त्याचे स्मरण म्हणून राजाने हे सुंदर राऊळ बांधावयास घेतले.



विष्णुवर्धनाचा दरबार, चेन्नकेशव मंदिर, बेलूर

तळकडू येथे असलेल्या कीर्ती नारायणाच्या मंदिराच्या तळाशी झालेल्या उत्खनात एक तामिळ लेख सापडला, ज्यात लिहिले होते, "विष्णूवर्धन राजाने चोळ राजा आदीयमन ह्याचा दारुण पराभव करून त्याचे तळकडू मधून समूळ उच्चाटन केले. त्या विजयाचे समापन म्हणून विष्णूवर्धन राजाने बेलूर येथे कीर्ती नारायणाचे मंदिर (साल १११७) रोजी बांधावयास घेतले."

तदनंतर विष्णुवर्धनाची राणी, आणि त्याचे वंशज नृसिंह (पहिला) आणि बल्लाळ (दुसरा) ह्यांनी मंदिराच्या प्रांगणात अजून काही इमारतींची उभारणी केली. विष्णुवर्धनाच्या राणीने चेन्नीगराय मंदिर बांधले, तर बल्लाळाने दान देऊन स्वयंपाकघर आणि अन्नधान्याच्या कोठारांची निर्मिती करून घेतली. त्यानेच शेजारची पुष्करणी खोदून घेतली, ज्याला आजही विपुल प्रमाणात पाणी असते.

वेड्या मोहोम्मदाचा (मोहोम्मद बिन तुघलक) एक सेनापती सालार ह्याने मंदिराची प्रचंड नासधूस आणि लूट केली. गोपुर आणि मंदिराचा कळस जमीनदोस्त केला. आज जी आपण मंदिर भोवताल ची भिंत पाहतो, ती त्या काळी अस्तित्वात न्हवती. मंदिराला संरक्षण हवे हा विचारच त्याकाळी कदाचित कोणाच्या मनास शिवला नसावा. वीर बल्लाळ (तिसरा, १२९२-१३४३) ह्याच्या काळात त्याचा एक सरदार सोमय्या दानायक ह्याने ती भिंत बांधून घेतली.

विजयनगर च्या पराक्रमी राजांच्या सश्रद्ध प्रयत्नांनी १३८७ मध्ये सोन्याचा मुलामा दिलेला कळस देवळाच्या गर्भगृहावर चढवला गेला. इस्लामी आक्रमकांकडून ध्वस्त करण्यात आलेले प्रवेशद्वाराचे गोपुर १३९७ मध्ये विटांनी परत बांधून काढण्यात आले, आणि चेन्नकेशवाचे वैभव परत दिमाखात झळाळू लागले. विजयनगरच्या साम्राज्याच्या छत्रछायेत अजून काही देवळे, नागनायक मंडप अश्या दृष्ट लागण्याजोग्या देखण्या इमारतींचे बांधकाम केले गेले, आणि बेलूर चे हे मंदिर भक्तांनी अजूनच गजबजले. अन........विजयनगरच्या पराभवापश्चात पुन्हा एकदा मंदिर भग्न केले गेले.

तदनंतर म्हैसूर च्या वडेयार घराण्याने मंदिराचे गतवैभव पुन्हा प्राप्त करण्याचा काही अंशी प्रयत्न केला. १९ व्या शतकात पडझड होत असलेले मंदिराचे कळस जमीनदोस्त करण्यात आले, आणि १९३५ मध्ये म्हैसूर गव्हर्नमेंट आणि वडेयार घराण्याकडून आलेल्या आर्थिक मदतीने देवळाचे पडलेले भाग साफसफाई करून परत बसवण्यात आले, आणि त्याला आजचे रूप देण्यात आले. आजच्या घडीला मंदिर देवस्थान समिती आणि आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया च्या देखरेखेखाली आले आहे.



# मंदिर प्रवेश



बेलूर च्या बस स्टॅन्डवर उतरून तुम्ही मंदिराच्या दिशेने चालायला लागलात, तर सर्वप्रथम तुम्हाला दिसू लागतात गोपुरावरचे झळाळणारे पाच कुंभ. तुम्ही जेव्हा बसमधून खाली उतरता, तेव्हापासूनच त्यांची नजर तुमच्यावर असते. जसे जसे मंदिराच्या जवळ जाता, तेव्हा तुम्हाला मंदिराचे बलाढ्य प्रवेशद्वार, डोक्यावर गाईची शिंगे असलेले पाच मजली गोपुर आणि मंदिराची भलीमोठी संरक्षक भिंत दिसू लागते. हे ग्रॅनाईट ने बांधून काढलेले विजयनगर कालीन भले थोरले प्रवेशद्वार तुम्हाला हंपीची आठवण करून देते. त्यावरचे पिवळे मजले विटा, लाकूड आणि चुन्याच्या साहाय्याने बांधले गेले.

बलाढ्य गोपुरातून पुढे सरकल्यावर तुमच्यासमोर उभा असतो सात मीटर उंचीचा ध्वजस्तंभ. काही खास दिवस असला की त्यावर वैष्णव पताका फडकावली जाते. लाकडी ध्वजस्तंभावर आता चकचकीत पितळेचे आवरण दिले असून त्याच्या पायथ्याशी चक्र, शंख अशी वैष्णव शुभचिन्हे कोरलेली दिसतात. ध्वजस्तंभाच्या पुढ्यात हात जोडलेल्या गरुडाची, काळ्या दगडातून कोरून काढलेली अप्रतिम मूर्ती उभी दिसते. पण मूर्ती होयसळकालीन नाही. ही मूर्ती विसाव्या शतकातील म्हैसूर चे एक नावाजलेले शिल्पी जवराचार्य ह्यांनी घडवलेली आहे.






## थोडेसे मंदिराविषयी

आपण महाद्वार ओलांडून पुढे चालत आलात की सरळ मंदिरासमोर उभे राहता. मंदिर एका १.२ मीटर उंचीच्या जोत्यावर घडवले आहे. मंदिरात जाण्यासाठी पूर्व, उत्तर आणि दक्षिण दिशेला पायऱ्या आहेत. ह्या प्रत्येक पायऱ्यांच्या दोन्ही बाजूस क्षेत्रपालांची भूमिज शैलीतील छोटी उप-मंदिरे आपले स्वागत करतात. ह्या छोट्या राऊळात एकेकाळी भैरव, भैरवी, दिगपाल, आणि अन्य क्षेत्ररक्षक देवतांच्या अत्यंत नाजूक मूर्ती डोळ्यात तेल घालून, हत्यारे उपसून खडा पहारा देत असायच्या. आता ह्यातील बहुतेक मंदिरे त्यांच्या मालकाविना निष्प्राण भासतात.


चेन्नकेशव मंदिराचे साधारण पणे जीवात्मा (पुढचा अर्धा भाग) आणि परमात्मा (मागचा अर्धा) असे दोन विभाग पडतात. जीवात्मा भागात आपल्याला सुरसुंदरी, राजे महाराजे, प्रणय शिल्पे, सैन्य, तत्कालीन दैनंदिन व्यवहार ह्यांचे दर्शन होते. तर मागचा अर्धा भाग हा परमात्म्याला, म्हणजेच विविध पुराणे, ग्रंथ ह्यांच्यातून होणारे भगवंताचे दर्शन ह्याला समर्पित केलेला आहे. आपण जिथून देवळात प्रवेश करतो, त्या पूर्व प्रवेशद्वारावर सर्प, वेली, काम देव आणि रती, गरुडतोरण ह्यांचे अत्यंत देखणे आणि एखाद्या दागिन्यासारखे नाजूक अंकन द्वारशाखेवर केले आहे. बाकीची प्रवेशद्वारे सुद्धा नाजूक कोरीवकामाने नखशिखांत मढलेली आहेत.

मंदिराचे छत ४८ अत्यंत नाजूक कलाकुसर केलेल्या खांबांनी अलगद तोलून धरलेले आहे, त्यातील प्रत्येकावरची नक्षी आणि कोरीवकाम हे खास वेळ काढून बघण्यासारखे. प्रत्येक प्रवेशद्वाराच्या आतील दोन्ही बाजूस बसण्यासाठी जोती आहेत. गर्भगृहासमोर मंडपात रंगशीला असून त्याच्या डोईवर तर केवळ अद्भुत कोरीव काम केलेले छत मोठ्या दिमाखाने होयसळांच्या कलेचे गुणगान गेली शेकडो वर्षे करीत आहे. मंडपासमोरच अत्यंत नाजूक अशी कलाकुसर असलेले गर्भगृहाचे प्रवेशद्वार आहे. त्यातील जय-विजय, आणि मकर तोरण तर दृष्ट लागण्यासारखेच. मंदिराच्या आवारात अजून बरीच सुंदर बांधकामे आहेत, ज्यांची माहिती आपण पुढे घेणार आहोत.



कळस असलेले
चेन्नकेशव मंदिर,
एडमंड डेव्हिड लियॉन,
सन१८६८

हे मंदिर इंटरलॉकिंग पद्धतीने बांधण्यात आले होते. त्यातील काही भाग हा आधी कोरून मग जोडला गेला तर काही भाग आधी जोडून तदनंतर कोरला गेला असे मानले जाते. मंदिराला पूर्वी कळस होता, पण त्याच्या वजनामुळे संपूर्ण इमारतीलाच धोका झाल्याने विसाव्या शतकात तो पाडून टाकण्यात आला. मंदिराच्या आत आणि बाहेर मिळून कोणे एकेकाळी ६००+ मूर्ती होत्या, ज्यातील जवळपास ८० मूर्ती सद्यस्थितीत चोरीस गेल्या आहेत. ह्या सगळ्याच मूर्ती अत्यंत सुबक असल्या, तरी पुस्तकात विस्तारभयाने त्यांचे वर्णन करणे अशक्य. त्यामुळे मंदिराच्या न चुकवण्याजोग्या मूर्तींची माहिती आपण घेणार आहोत. मंडळी, चला तर मग चेन्नकेशवाच्या दर्शनाला.




## चेन्नकेशव मंदिर, बेलूर, कर्नाटक

(सौजन्य - एपिग्राफिया कर्नाटिका, बी. लुईस राइस, म्हैसूर सरकारी प्रेस, सन १९०२.)

# द्वारशाखा आणि मकर तोरण



जेव्हा तुम्ही मंदिराच्या प्रवेशद्वारासमोर उभे राहता, तेव्हा तुमच्या डाव्या बाजूला एक मुलगा मोठ्या विक्राळ सिंहास मारत असल्याचे शिल्प दिसेल. ते आहे होयसळांचे राजचिन्ह. द्वारशाखेच्या खालच्या बाजूस इक्षुदंड आणि बाण धारी नितांत सुंदर असे मदन आणि रती दिसतात. ईश्वरप्राप्ती करायची असल्यास काम क्रोधादि षड्रिपू बाहेर ठेऊनच मंदिरप्रवेश करावा असा संकेत जणू ते आपल्याला देत असतात.

ललाटबिंब, म्हणजेच प्रवेशद्वारावरील बारीक नक्षीकाम न चुकवण्यासारखे. दाराच्या दोन्ही बाजूच्या खांबांवर रम्य नक्षीकाम केलेले मकर आणि त्यावर आरूढ झालेले वरुणदेव तुम्ही पाहू शकता. मकराच्या पिसाऱ्यासारख्या शेपटीने पूर्ण प्रवेशद्वाराच् जणू व्यापले आहे असा भास होतो. मकरांच्या तोंडातून मोहक वलये निघून ती वरच्या कीर्तिमुखात विलीन होतात. वलयांच्या वर जर बारकाईने पाहिलेत तर तुम्हाला अष्ट दिगपाल त्यांच्या वाहनांसमवेत खालील दृश्य बघताना दिसतील.




वळणदार वलयाच्या सुंदर महिरपीखाली तुम्हाला हिरण्यकश्यपू चे पोट फाडणारा बारा हातांचा उग्र नृसिंह दिसेल. त्या वीतभर शिल्पात तुम्हाला नृसिंहाच्या हातातील शस्त्रास्त्रे, मांडीवर आडव्या पडलेल्या हिरण्यकश्यपू च्या पोटातून बाहेर आलेली आतडी, त्याच्या सेनेतील भयभीत दानव त्याचे दागिने असे अत्यंत जटिल गोष्टीही सहज दिसतील. त्याखालील गरुड आणि भोवतालच्या सेविका पण नितांत सुंदर. पण एवढ्यावर थांबतील ते होयसळांचे कारागीर कसले? तुमचे आधीच बारीक झालेले डोळे जरा अजून बारीक करा, आणि नृसिंहाच्या भोवतालच्या वेलीमध्ये बघण्याचा प्रयत्न करा. त्या काही सेंटीमीटर च्या गोलांमध्ये तुम्हाला चक्क दशावतारांचे दर्शन होईल.

नितांत सुंदर प्रवेशद्वाराचे दर्शन घेतल्यावर चला देवळाच्या बहिर्दर्शनाला. दरवाज्याच्या दोन्ही बाजूस तुम्हाला विविध पौराणिक प्रसंग कोरलेले दिसतील. त्यातील हरेक शिल्प हे मूर्तिकलेचा अद्वितीय आविष्कारच. त्यातील काही महत्त्वाची शिल्पे आपण पाहुयात.

# उग्र नृसिंह

ॐ उग्रवीरं महा विष्णुं, ज्वलन्तं सर्वतो मुखम्।
नृसिंहभीषणं भद्रं, मृत्युमृत्युं नमाम्यहम्॥

होयसळांचे कुलदैवत नरसिंह. सामर्थ्य, पराक्रम, धर्म, आणि धैर्याचे प्रतीक. आपल्याला होयसळांच्या प्रत्येकदेवळांवर, प्रवेशद्वारावर, मंदिरांच्या आत, खांबावर, मंदिरांच्या बाहेरील भिंतींवर आणिअगदी छतावरच्या झुंबरांच्यामधोमध सुद्धा नरसिंह भेटतात.




बेलूर येथील चेन्नकेशवा मंदिरावरच्या नरसिंहाने चार हातात शंख, चक्र, गदा आणि पद्म धारण केलेले आहेत. धनुष्य बाण, पाश, घंटा, परशु, तलवार इत्यादी शस्त्रे त्याच्या उर्वरित बलशाली हातात शोभून दिसत आहेत. किर्तीमुखाच्या महिरपीखाली विराजमान असलेल्या सोळा हातांच्या नरसिंहाने राक्षसांच्या राजाला मांडीवर दाबून ठेवले आहे.

जिवाच्या आकांताने तो राक्षस राजा काळाच्या पकडीतून निसटण्याचा प्रयत्न करीत आहे, पण त्याचा ढाल धरलेला डावा हात नरसिंहाने आपल्या डाव्या पायाने जखडून ठेवला आहे. आत्यंतिक क्रोधाने प्रलयंकारी नरसिंहाचा जबडा विस्फारला आहे, त्याचे भयानक डोळे जणू आग ओकीत आहेत आणि भुवया धनुष्यासारख्या ताणल्या गेल्या आहेत. चार भुजांनी त्याने हिरण्यकश्यपू चे पोट फाडले आहे, वरील दोन हातांच्या बोटांमध्ये राक्षसाचे आतडे अडकून हातांबरोबर वर उचलले गेले आहे. जणू हिरण्यकश्यपू च्या आतड्यांची माला त्या क्रोधीत आणि उग्र देवतेने आपल्या गळ्यावर धारण केली आहे असा भास होतो आहे.

# गजासुर संहार




नऊ दिवसांच्या भीषण युद्धानंतर दुर्गा देवीने महिषासुराचा वध केला. ह्या महिषासुराला गजासुर नावाचा राक्षस पुत्र होता. वडिलांच्या वधाचा प्रतिशोध घेण्यासाठी त्याने तप करून ब्रह्मदेवाकडून बऱ्याचअद्भुत शक्ती मिळवल्या. त्या शक्तींचा गर्व झालेला गजासुर लोकांना उन्मत्त हत्तीचे रूप धारण करून त्रास देऊ लागला. त्याला रोखण्यासाठी आलेल्या देवसेनांचा त्याने पराभव केला. पराभूत झालेले देव, ऋषीआणि तपस्वी महादेवाला शरण गेले आणि महादेव स्वतःच युद्धाला उतरले.

भीषण युद्धात गजासुराने स्वतःचा आकार मायेने मोठा करून महादेवाला गिळून टाकले. असुराच्या पोटात जाताच महादेव अत्यंत क्रोधीत होऊन त्यांनी आपले भयानक तांडवनृत्य सुरु केले आणि पोटातील वेदना असह्य होऊन गजासुर किंकाळ्या फोडू लागला. तो ओरडत असताना भोलेनाथाने राक्षसाला आतून उभ्यानेच फाडले आणि त्याचेकातडे अंगावर पांघरले. त्यालाच गजासुर संहार रूप असे म्हणले जाते.

हे संहारक युद्ध तामिळनाडूमधील वेळूवूर या गावी झाले असे मानतात.

गजासुर संहार, दक्षिण भारतातील पल्लव, चोल आणि होयसळांचे एक प्रसिद्ध शिल्प. होयसळांच्या बेलूर आणि हळेबिडू येथील देवळात अद्भुत कल्पकतेने दाखवले आहे. ह्याचेच गज चर्माम्बधारी (हत्तीचेकातडे धारण करणारा) शिव असेही उल्लेख आपल्याला पुराणातून सापडतात. बेलूरच्या तब्बल सोळा हातांच्या महादेवाने आपल्या तीन हातांनी हत्तीची जाड कातडी स्वत:भोवती पांघरली असून ते जणू नृत्यात स्वतः ला हरवून बसलेले भासतात. हातात त्यांनी विविध शस्त्रास्त्रे धारण केली आहेत. अजिंक्यअसा विजय त्रिशूळ, विश्वनिर्मितीचा हुंकार ज्यातून प्रकटला तो डमरू, भयानक चंद्रहास खङग, भिक्षेची वाटी, पाश, पशुपतास्त्र, अंकुश, वज्र, बाण, गदा, खट्वान्ग, घंटा, पिनाक धनुष्य, नाग, आणि अक्षमाला देवाने अगदी लीलया तोलल्या आहेत. शिल्पाच्या माथ्यावर हत्तींचे मागचे पाय तुम्हाला स्पष्टपणे दिसतात. महादेवाच्या तांडवाचा भार सहन न झाल्याने मृत्युपंथाला लागलेल्या हत्तीचा डोळा बरेच काही सांगून जातो. महादेवाचे प्रेतगण त्याच्याभोवती नाचत आहेत, त्याची स्तुती करीत आहेत. नंदी भक्तिभावाने आपल्या धन्याकडे पाहत आहे.



# हरिहर

शिवाय विष्णुरूपाय शिवरूपाय विष्णवे । शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः ॥
रुद्रस्य परमो विष्णुर्विष्णोश्च परम: शिवः । एक एव द्विधा भूतो लोके चरति नित्यसः ॥

शिव हेच विष्णुरूप, आणि विष्णू हेच शिवरूप आहेत. शिव विष्णूंच्या हृदयात, आणि विष्णू महादेवाच्या हृदयात वास करतात. रुद्राची परम शक्ती म्हणजे विष्णू, आणि विष्णूंची परम शक्ती म्हणजेच रुद्र होय. एकच परम तत्व ह्या दोघांच्यातून चराचर सृष्टीत वास करत असते.

उजव्या हातात महादेवाची जपमाळ आणि विजय त्रिशूल तर डाव्या हातात श्रीहरीचे कमल आणि गदा तोललेले हरिहराचे अत्यंत सुंदर शिल्प आपल्याला मंदिराच्या मागच्या भागावर दिसते. दुर्मिळ गोष्ट म्हणजे त्यांची वाहने नंदी आणि गरुडही आपल्याला हरिहरच्या पायाशी कोरलेली दिसतात. शैव पंथीय आणि वैष्णव ह्यांच्यात वेळोवेळी भांडणे होत, आणि ती मिटवण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या स्तरातून होत असत.

त्यापैकी एक प्रयत्न म्हणजेच हरि म्हणजे विष्णू आणि हर म्हणजेच महादेव ह्यांची संयुक्त मूर्ती, जी शंकरनारायण नावाने सुद्धा ओळखली जाते.  उपासना पद्धत कोणतीही असली, तरी समस्त हिंदू एकच आहेत, शैव आणि वैष्णवांच्या मनात ह्या दोहोंविषयी भेद उत्पन्न झाला, तरीही दोघे आतून एकच आहेत हा संदेश शिल्पकार आपल्याला देतो.



## सूर्य नारायण




प्रदक्षिणामार्गावर खालच्या दोन्ही हातात डौलदार कमल, आणि वरच्या हातातून चक्र आणि शंख धारण केलेले अत्यंत सुंदर असे सूर्यनारायण बहिर्दर्शन घेत असलेल्या भक्तांचे जणू अंधकारमय अज्ञान दूर करत असतात. रथारूढ सूर्य नारायणाच्या पायाशी त्यांचा स्वार अरुण तुम्हाला दिसेल. तसेच गायत्री, बृहती, उष्णीं, जगती, त्रिष्टुभ, अनुष्टुभ, आणि पंक्ती नावाचे घोडेही तुम्हाला रथाला जोडलेले दिसतील.




**प्राप्तेतु षोडशे वर्षे**
**गर्दभी अप्सरा भवेत|**

ह्याचा अर्थ, जेव्हा सोळावे वरीस लागते, तेव्हा गर्दभी, म्हणजेच गाढवीण सुद्धा अप्सरेसमान दिसू लागते. हे मजेदार शिल्प आपल्याला मंदिराच्या उत्तर भिंतीवर पाहायला मिळते. ह्यात एक तरुण गाढवाचे मस्तक असलेल्या स्त्री ला आलिंगन देताना दिसतो. नुकतेच तरुणपण प्राप्त झालेल्या व्यक्तीस सगळे कसे गोग्गोड  छान दिसत असते हे त्याचे तात्पर्य.



## दक्ष

दक्ष हा ब्रह्माचा मानसपुत्र,प्रजापतींपैकी एक आणि राजर्षी समजला जातो. ह्याचे उल्लेख ऋग्वेदात सुद्धा आढळतात. पुराणानुसार दक्षाने मनू आणि शतपुत्र ह्यांची कन्या प्रसूतीशी विवाह केला. प्रसूती ला आपण एडक्याचे डोके असलेल्या दक्षा शेजारी पाहू शकता. दक्ष आणि प्रसूती ला अनेक कन्या झाल्या, त्यातील सर्वात लहान कन्या म्हणजे सती. सतीने दक्षाच्या मनाविरुद्ध जाऊन महादेवाशी विवाह केला. एका यज्ञात सती समोर असताना दक्षाने महादेवाचा अपमान केला, आणि तो सहन न होऊन सतिने आत्मदहन केले. ह्याचा संताप येऊन शिवाचेच एक रूप असलेल्या वीरभद्राने दक्षाचे डोके उडवले. क्रोध शांत झाल्यावर भोलेनाथांनी दक्षाला माफ करून एका एडक्याचे डोके बसवले आणि त्याला जीवनदान दिले.

# भीम आणि भगदत्त

नरकासुर हा भूदेवीचा पुत्र. त्याच्या प्रेमापोटी भूदेवीने श्रीहरी विष्णूंकडून वैष्णवास्त्र मागून घेतले. नरकासुराचा श्रीकृष्णाने वध केल्यानंतर त्याचे प्राग-ज्योतिषपूर चे राज्य, त्याचा पुत्र भगदत्त ह्याकडे आले. सिंहासनाबरोबर त्याला मिळाले त्याच्या वडिलांचे वैष्णवास्त्र. कौरवांच्या बाजूने आपली हत्तींची बलाढ्य सेना व नरकासुराच्या दिव्यास्त्रांसकट तो कुरुक्षेत्रात उतरला.

हे दुर्मिळ शिल्प आपल्याला दिसते बेलूर च्या चेन्नकेशव मंदिराच्या प्रांगणात असल्येल्या वाहन मंडपावरच्या उत्तर भिंतीवर. इथे आपण सुंदर दागिन्यांनी मढलेल्या बलाढ्य सुप्रतिक हत्तीवर अंबारीत बसलेला भगदत्त पाहू शकता.




गम्मत म्हणजे त्याच शिल्पात भीम सोंडेच्या पकडीतून सुटून हत्तीच्या डोक्यावर झेपावताना दाखवला आहे. भीमाचा आवेश, त्याची उगारली गेलेली गदा, त्याच्या पायांची हालचाल त्याचा विद्युतवेग दर्शवत आहेत. हत्तीचे नियंत्रण करणारा माहूत हातात एक सुंदरसा अंकुश घेऊन बसला आहे. उजव्या हातातील अंकुश त्याने हत्तीच्या विशाल गंडस्थळात रुतवला असून डाव्या हाताने तो त्याच्याकडे झेपावणाऱ्या भीमावर शस्त्र उगारीत आहे.

# होयसळांच्या सुरसुंदरी


चेन्नकेशव मंदिराच्या प्रमुख आकर्षणांपैकी एक म्हणजे ३५ सुरसुंदरी आणि ३ वादक. जिथे बाहेरचे मंदिराचे खांब छताला मिळतात त्या जागी ह्या अप्सरा आपल्याला भेटतात, ज्यांना देवांगना किंवा शालभंजिका असेही म्हणले जाते.




ह्यातील काही ललना फळ, पाने, जलकुंभ धरून आहेत, त्या आपल्याला देवाकडे काही रिकाम्या हाताने जाऊ नये याची आठवण करून देतात. पूर्वी गर्भगृहा समोरच्या रंगशिळेवर अनेक नृत्यांगना आपली कला देवासमोर सादर करत. त्यांची आठवण म्हणून मंदिरावरच्या काही सुंदरी नृत्य करीत असताना दिसतात. एखादी सुंदरी पायात रुतलेला काटा काढत असते, तिला वास्तुशास्त्रात शुभगामिनी असे नाव आहे. कामक्रोधांचा काटा मनातून काढून मगच देवदर्शनाला यावे हा संदेश ती आपल्याला देत असते.



दोन धनुष्य बाण धारण केलेल्या तरुणी आपल्याला इथे भेटतात, त्यांचे नाव मारीचीका. त्यांचा अविर्भाव, देहाचा पीळ, केशरचना, त्यांच्या सेविकांच्या केशरचना सारेच आपल्याला एका जागेस खिळवून ठेवतात. एका मारीचीकेच्या सेविकेच्या हातात तर आपल्याला पाळीव हरीण दिसते. शिल्पकाराने हे समकालीन प्रासंगिक बारकावे शिल्पात ज्या कलात्मकतेने थिजवून ठेवले आहेत त्याला तोड नाही.






एका शिल्पात सुंदरी रंगपंचमी खेळताना दाखवली आहे. सुंदरीच्या हातात एकेकाळी पिचकारी असावी, पण काळाच्या ओघात ती तुटली असावी. तिचा एक सेवक तिला कुंभात पाणी भरून देताना दिसत आहे, तर दुसरा सेवक चक्क घमेल्यातून पिचकारीने रंग भरताना दाखवला आहे. एका सुंदरीच्या हातात रुद्रवीणा आहे, आणि ती मोहक पदन्यास करत तिच्या बाकीच्या वादकांबरोबर आपली कला भगवंताला अर्पण करताना दाखवली आहे.

एक विधीचीता नामक शृंगारिका आपल्या लांबसडक बोटांच्या चिमटीने कुंकू लावताना दिसत आहे. तिच्या उजव्या पायाशी तिची एक सेविका आरसा धरून तिला मदत करीत आहे. डाव्या बाजूला दुसऱ्या सेविकेने तिच्या सुंदर वेणीत खोवण्यासाठी म्हणून मोत्याची लडी तयार ठेवली आहे. एका ललना एका पक्ष्याला आपल्या नाजूक बोटात पकडून त्याच्याशी काही गुजगोष्टी करताना दाखवली आहे. तिचे नाव आहे शुकासारिका. तिच्या डाव्या बाजूला तिच्या सेविकेने द्राक्षांचा घड हातात धरला आहे.

एक सुरसुंदरी त्रिभंग अवस्थेत डोक्यावर ढोल वाजवत नृत्यमग्न झालेली आहे. तिला सुस्वभावा म्हणतात. ज्या तऱ्हेने तिचे दागिने, वस्त्रे हेलकावत आहेत त्यावरून तिची गती आपल्याला समजते.
एक सुंदरी नुकतीच स्नान करून बाहेर आली असून वस्त्र नेसत आहे. पण तिच्या पायाशी शिल्पीने एक विंचू काढला असून त्यामुळे त्या सुंदरीची उडालेली तारांबळ शिल्पकाराने ज्या पद्धतीने खडकातून कोरून काढली आहे त्याला तुलना नाही. तिचे अतिशय तलम वस्त्र, त्यावरची जरी, तिने हातात धरलेला सोगा, तिचे अर्धोन्मलित डोळे, ताणलेल्या भृकुटी, तिच्या खांद्यावरचे हेलकावणारे उत्तरीय हे सगळेच थक्क करून टाकणारे.
एकनाथ महाराज म्हणतात विंचू चावला, काम क्रोध बळावला. ह्या विंचवाला उतारा- तमोगुण मागे सारा. अगदी त्याचप्रमाणे ही ललना आपल्याला हा कामक्रोधादि विंचू देवळाच्या बाहेर ठेचून मगच आत येण्यास बजावत आहे.










Drifter Adwait

काहीश्या कोनात आणि अंधारात राहिल्याने कदाचित ह्या मूर्ती आक्रमकांपासून आणि चोरांपासून बचावल्या असाव्यात. पूर्वी मंदिर हे केवळ देवालय नसून सामाजिक संस्था, एक हक्काचे व्यासपीठ असायचे. तिथे प्रजेला आपले कला कौशल्य देवाच्या चरणी अर्पण करण्याची संधी मिळायची. ह्याला देवाची रंगभोग सेवा म्हणले जात असे. तर ह्या सुंदरी आपल्याला मंदिरात जाताना कोणत्या मनस्थितीत असावे ह्याची आठवण करून देतात. ह्यासर्व अप्सरांची देहबोली, केशरचना, त्यांचे सेवक सेविका, त्यांच्या मागच्या माहिरपीची नक्षी, त्यांचे हावभाव, पदन्यास, हस्तमुद्रा ह्या शब्दातीत. इथे शब्द अपुरे पडतात अन सुरु होतो स्व-प्रत्ययाचा प्रदेश. घाई न करताअगदी सवड काढून ह्या सुरसुंदरी बघाव्यात. त्यांच्या आपल्या मनावर होणाऱ्या परिणामाची तपासणी करावी.  केवळ छिन्नीहातोडीने हे सर्व काम कसे साध्य झाले, ह्याचा विचार करत दिग्मूढ अवस्थेत बाह्य प्रदक्षिणा संपवावी आणि मंदिराच्या मंडपात प्रवेश करावा.



उपमंदिरातील
भैरव-भैरवी








देवकोष्ठातील
गरुडारूढ विष्णू



किर्तीमुखावरील ब्रह्मा

महाकाली व अंधकासूर वध



वराह




नृत्य सरस्वती





महिषासुर मर्दिनी



# मंदिराचे वितान



बेलूर चे चेन्नकेशवा मंदिर म्हणजे स्थापत्यशास्त्राचा चमत्कार. बाहेरील भिंती इंचा-इंचावर पौराणिक कथांनी मढवलेल्या. त्यांची इतकी गर्दी, की आपला पाय मंदिराच्या बाहेरच घुटमळतो. पण, देवळाचा खरा चमत्कार आतमध्ये. तिचे नाव - भुवनेश्वरी. नाही, ही कोणी देवता नसून हे आहे चेन्नकेशवा मंदिराच्या छप्पराचे नाव. मी काही सिस्टीन चॅपल पाहिलेले नाहीये, पण हे निदान भारतातील अत्यंत सुंदर छतांपैकी एक नक्कीच असेल.

तुम्ही जर त्या व्यासपीठावर देवासमोर उभे राहिलात तर हा चमत्कार तुमच्या थेट डोक्यावर असेल. जबरदस्त कलाकुसर, इतकी बारकाईने केलेली, की वर बघता बघता तुम्ही स्वतःला विसरून जाता. वर बघून बघून मान दुखायला लागली, की काही वेळाने तुम्ही परत पृथ्वीवर म्हणजेच भानावर येता.

असे म्हणतात की हे छत ५२ दगडांचे बनलेले असून इंटरलॉक पद्धतीने आणि चुन्याच्या साहाय्याने बांधून काढले आहे. दहा पंधरा वर्षांपूर्वी बांधलेले सिमेंट कॉंक्रीट चे पूल भूकंपात भुईसपाट होतात, पण ह्याला गेल्या आठशे वर्षात फारसे काहीही झालेले नाहीये.

गर्भगृहाच्या समोर गोलाकार रंगशिला किंवा व्यासपीठ. असे म्हणतात, की ज्याने हे देऊळ बांधले, त्या होयसळ राजा विष्णूवर्धन ची राणी शांतालादेवी प्रसिद्ध नर्तकी. ती ह्या व्यासपीठावर देवापुढे आपली कला अर्पण करायची.






ज्या चार खांबांवर हा चमत्कार तोलून धरला आहे, त्यावर एक एक अप्सरा तुमच्यावर लक्ष ठेऊन असते. ती तुमच्या भक्तीची जणू परीक्षाच घेत असते. त्यातील दोन मूर्तींच्या खाली दसोजा आणि चावण ह्या महान शिल्पीन्नी आपली नावे हळेकन्नड़ लीपिमध्ये कोरून ठेवलेली. असे म्हणतात की त्यातील नृत्यमुद्रेत असणारी सुरसुंदरी म्हणजेच राणी शांतलादेवी होय. त्यांचे वर्णन करण्याची क्षमता माझ्यात नाही. ती प्रत्येकाने स्वतः अनुभवावी अशी कलाकुसर. तुम्ही बेलूरास गेलात, तर बाहेरून मंदिर जरूर बघा, पण छत बघण्यास वेगळा वेळ देऊन आत जा.




## मंदिराचे स्तंभ

चेन्नकेशव मंदिराचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे, जणू लेथ मशीन वापरून कलाकुसर केल्यासारखे भासणारे खांब. देवळातील एकही स्तंभ दुसऱ्याशी मिळता जुळता नाही. स्तंभ जिथे छताला मिळतात तिथे आपण भारवाहक बघू शकतो. ४८ खांबी देवळात दोन स्तंभ विशेष करून आपल्या नजरेत भरतात, ते म्हणजे नृसिंह आणि मोहिनीस्तंभ.



नृसिंह स्तंभ:




आकाराने थोडासा वेगळा, बोजड वाटणारा हा खांब एकेकाळी त्याच्या अक्षाभोवती गोल फिरत असे असे म्हणतात, पण त्याला कुठलाही पुरावा नाही. संपूर्ण स्तंभ छोट्या छोट्या देवकोष्ठांनी भरून काढलेला असून त्याच्या मधील भागात श्रीहरी विष्णूंची बरीच रूपे आपल्याला बघायला मिळतात. खांबाचा पायथा आयताकृती असून त्यावर शिव पार्वती, अंधकासूर, त्रिपुरान्तक आणि समुद्रमंथन इत्यादी पौराणिक कथांचे अंकन मोठ्या बारकाईने केलेले आहे. स्तंभ जिथे छताला मिळतो तिथे विविध सुरसुंदरीं आपल्याला भेटतात.




## मोहिनी स्तंभ:

गर्भगृहाच्या जवळचा एक अत्यंत सुडौल लावण्यवतीचे अंकन केलेला स्तंभ आपल्या समोर असतो, त्याचे नाव मोहिनी स्तंभ. त्या रूपवतीचे पुढचे दोन्हीही हात तोडल्यामुळे ही कोणती देवी असेल ह्याचा पत्ता लागत नाही, पण हे विष्णूचे मोहिनी रूप असावे असे तज्ज्ञांचे मत.

मोहिनीच्या मागील खांबांवर नाजूक नक्षीमध्ये अगदी तीन चार इंचांमध्ये दशावतार दडलेले. मोहिनीचे शरीर सौष्ठव इतके सुंदर रीतीने कोरले आहे की ही ललना एकेकाळी नक्कीच जिवंत असली पाहिजे अशी आपली खात्रीच होते. तिचे दागिने, तिचा मुगुट, वक्राकार भुवया, मृगनयन, काहीसे गूढ भासणारे अस्फुट स्मित, नाजूक सिंहकटी, कमरेवरची मेखला, पैंजण, पायाची लांबसडक बोटे, त्यांवरील नखे सारेच अचंबित करणारे बारकावे. भोवतालच्या महिरपीची नाजूक नक्षी कशी, तर हात लावला तर निखळून येईल ही भीती वाटावी अशी.

# चेन्नकेशव मंदिराचे गर्भगृह






गर्भगृहाच्या समोर उभे राहिल्यास तुम्हाला जणू खऱ्या स्वर्गाच्या दारात उभे असल्याचा भास होईल, आणि ह्याचे कारण म्हणजे शिल्पिंनी पत्थरात उतरवलेलं वैकुंठ. द्वाराच्या दोन्ही बाजूचे <u>जय-विजय</u> प्रहरी चेहेऱ्यावरी गंभीर पण आश्वस्त भाव ठेऊन भक्तांचे स्वागत करतात.

हातात शंख, चक्र घेऊन सुंदर गदांवर काहीसे रेललेले हे द्वारपाल सवड काढून बघण्यासारखे. त्यांचे शरीर घासून एवढे गुळगुळीत केलेले, की जणू मुशीतून ओतलेले झळाळते काळे सोनेच. जवळ जवळ तुमच्या आमच्या उंचीचे हे द्वारपाल शिल्पिंनी नाजूक दागिन्यांनी अक्षरशः नखशिखांत मढवून काढले आहेत. मुकुट, कुंडले, हार, यज्ञोपवीत, वनमाला, कमरेवर ची मेखला, हातातील कडी, त्यांची शस्त्रास्त्रे, दंडा वरची किर्तीमुखे ह्यावरची अतिशय नाजूक कलाकुसर आजकालच्या घाऊक जमान्यातल्या कारागिरांसठी एक वस्तुपाठच.



## गर्भगृहा वरील मकर तोरण

द्वारपालांवरून आपण येऊयात त्यांच्या डोईवरच्या तोरणावर. हे तोरण आपले मकर तोरण हे नाव सार्थ करतात इतुके देखणे. तोरणाच्या दोन्ही बाजूस मनमोहक पिसारा असलेले मकर आणि त्यांच्या पाठीवर आरूढ आहेत वरुण देव आणि त्याची भार्या वारुणी. मकरांच्या आवासलेल्या विक्राळ मुखातून वेलबुट्टी बाहेर येऊन एखाद्या जुन्या घराण्याच्या मुरलेल्या गायकाच्या सुरेल तानांप्रमाने लहरी उत्पन्न करत वरच्या किर्तीमुखात जाऊन विलीन होताना तुम्हाला दिसतील. एका वेलबुट्टी लाटेवर एक, ह्याप्रमाणे मत्स्य अवतारापासून घोड्यावर मांड ठोकलेल्या कल्की अवतारा पर्यंत चे दशावतार मुर्तीकाराने ज्या खुबीने त्या नक्षित दडवून ठेवले आहेत त्याला दुसरी उपमा नाही.




ह्या वक्राकार वेलबुट्टीच्या रुपात मकरातून उगम पावणारे आणि किर्तीमुख रुपी काळाच्या उदरात लुप्त होणारे जन्म मृत्यू चे अविरत चक्रच शिल्पकराला ह्यातून दाखवायचे असावे. त्यां लहरींची एक मोठी डौलदार कमान तयार होते आणि त्या जीवन मृत्यू च्या सुंदर कमानिखाली विराजमान आहेत लक्ष्मी-केशव. भगवान्, त्याचे चावरी ढाळणारे सेवक ह्यांचे मुगुट, शस्त्रे, हावभाव ह्यातील बारकावे आवर्जून बघण्यासारखे, हे सुज्ञांना सांगणे नलगे.

त्यांच्या खाली आठ गायक, वादक आणि नृत्याने देवाची रंगभोगी सेवा करणारे त्रिमितीय कलाकार. त्यांच्याच माळेत देवाचा महिमा गाणारे दोन भक्त आणि तुंदीलतनु कुबेर. त्या मालेखाली श्रीहरिंचे लांछन असलेले पाच दक्षिणवर्ती शंख आणि दोन्ही बाजूस एक एक विक्राळ व्याल. ह्या दोन्ही त्रिमितीय माला, वरचे लक्ष्मी केशव, मकर, त्यावरच्या डौलदार महिरपी हे सगळे एका शिलेतून कोरून काढलेले. बघा, विश्वास ठेवता येत असेल तर.




Drifter
Adwait


Drifter
Adwait

## प्रांगणातील इतर काही इमारती

**कप्पे चेन्नीगराय मंदिर:**
प्रांगणाच्या उत्तर भागात राणी शांतलादेवी ने १११७ मध्ये ह्या द्विकुट मंदिराचे बांधकाम सुरू केले. देवळात चेन्नकेशव आणि लक्ष्मीनारायण देवांची दोन गर्भगृहआहेत. मुख्य मंदिराप्रमाणेच हे मंदिरसुद्धा जगती वर उभारलेले असून मंडपाच्या वितानावर विष्णू आणि लक्ष्मीची मध्यवर्ती प्रतिमा असून त्याभोवती दिगपालांनी फेर धरला आहे. मुख्य मंदिरा प्रमाणेच ह्या दोन्ही गर्भगृहांच्या बाहेर जय विजय आणि लक्ष्मी केशव ह्यांचे अंकन असलेली मकरतोरणे आहेत.



**वीर नारायण मंदिर:**
मुख्य मंदिराच्या पश्चिमेस असलेले हे देऊळ राजा बल्लाळ (दुसरा) ह्याच्या काळात बांधले गेले. मंदिर एककूट पद्धतीचे वेसर शिखर असून मंदिरास चौरस आकाराचा मंडप आहे. मंदिराच्या बाह्यभिंतींवर बरीच सुंदर शिल्प आहेत, पण त्यांची नासधूस झाल्याने त्यांची अवस्था खूपच वाईट आहे. त्यातील उल्लेखनीय शिल्प म्हणजे उत्तर भिंतीवरील भीम आणि भगदत्त ह्यांच्यातील कुरुक्षेत्रावरील युद्धप्रसंग, दक्षिण भिंतीवर वास करत असणारे भैरवासह नृसिंह, आणि अपस्मार पुरुषावर नृत्य करीत असलेला महादेव.

**पुष्करणी:**
ह्या छोटेखानी मंदिरांबरोबरच प्रांगणाच्या ईशान्येला एक नेटकी पुष्करणी आहे. ह्या विपुल पाणी असणाऱ्या पुष्करणीचे बांधकाम बल्लाळ (दुसरा) ह्याच्या कारकिर्दीत झाले. ह्याचे जल अत्यंत शुद्ध असल्याने, आणि खाली नैसर्गिक जिवंत झरे असल्याने विष्णूच्या पहिल्या आणि दुसऱ्या अवताराचे वंशज आपल्याला ह्या पाण्यात अगदी निर्धोक पणे विहार करताना दिसतात. ह्या पुष्कर्णीच्या प्रवेश द्वारावर गजांत लक्ष्मीचे छोटे पण सुडौलशिल्प दिसते. पाश्चिमाभिमुख छोटी दोन देऊळे पुष्कर्णीच्या कुंपणाच्या भिंतीत आहेत, पण त्यांचे अंधारे गाभारे मात्र त्यांच्या मालकांशिवाय काहीसे पोरके भासतात.






**अंडल देऊळ:**
अंडल म्हणजे सतराव्या शतकातील दक्षिण भारतातील प्रमुख संत कविं पैकीएक. भू देवीचाअवतार समजल्या जाणाऱ्या ह्या थोर कवयित्री कोठाई, नचीयार, आणि गोडादेवी ह्या नावांनी ओळखल्या जात. बारास्तंभी मंडप असलेले हे मंदिर प्रांगणातील सर्वात नवीन मंदिर. नवीन नवीन म्हणजे किती नवीन? तर तीनशे वर्षांपूर्वी बांधले गेलेले. मंदिराच्या बाह्य भिंतीवर बासरीवादन करणारा कान्हा, त्रिविक्रम, नृत्य भैरव आणि काली ही सुंदरशिल्प आवर्जून बघावीत अशी.







चेन्नकेशव मंदिरात प्रांगणाच्या पूर्व भिंतीवर छत आणि खांब घालून त्यांचे छोट्या छोट्या मंदिरात रूपांतर करण्यात आले आहे. त्यातले देव आपला बहुतकरून सगळा वेळ बंद दारामागे, भक्तांच्या प्रतिक्षेतच घालवतात. ह्या पूर्वभिंतीमध्ये गज द्वारनामे एक भलामोठा दरवाजा आहे, जो केवळ उत्सवाच्या प्रसंगी उघडला जातो. मंदिर बघून दमला असाल तर मंदिर प्रांगणाच्या उत्तर भिंतीवर जुने खांब उपयोगास आणून ओसऱ्या बनवलेल्या आहेत, तिथे जरा शांतपणे टेकून बसावे. आपण कायकाय पहिले ह्याची उजळणी मनाशी करावी. प्रकाशचित्रे कशी निघाली आहेत ह्याची चाचपणी करावी. ह्या ओसरीच्या भिंतीत काही शिलालेख, जुन्या मूर्ती, वीरगळ बसवलेले आहेत, त्यांचे दर्शन घ्यावे.

मंदिर बघण्यासाठी मार्गदर्शक (गाईड) अवश्य करावा. त्यांच्याबरोबर संपूर्ण मंदिर बघावे, त्यातील बारकावे समजून घ्यावेत आणि गाईड ची दक्षिणा देऊन पुन्हा मंदिर अनुभवावे. आपल्या गतीने, आपल्या स्वतःच्या आकलनाने, कलाने आणि वेळ काढून.
ह्या आठवणी आयुष्यभर जोपासण्याच्या. त्यामुळे मंदिराच्या पवित्रतेचे भानआणि भक्तांच्या श्रद्धेचा मान ठेऊन पुष्कळ प्रकाशचित्रे (फोटो) काढावित. मंदिर जागृत देवठाण असल्या कारणाने सकाळी लवकर, साडेसातच्या सुमारास उघडते आणि संध्याकाळी साडेसात वाजता बंद होते. गर्दी कमी असल्याने आणि सकाळच्या कोवळ्या उन्हात सुंदर प्रकाशचित्रे काढता येतात.
मंदिरास भेट देण्यास तिकीट नाही. मंदिरा बाहेर पार्किंग साठी विपुल जागा उपलब्ध असून गोपुराबाहेर पादत्राणे ठेवण्याची व्यवस्थाआहे. मुख्य दरवाजाच्या बाजूला, मंदिर प्रांगणात पुस्तक स्टॉल आहे, जिथे आपण ASI आणि इतर लेखकांनी लिहिलेली माहिती पुस्तके विकत घेऊ शकता. बेलूर गावात मुक्कामासाठी बरेच पर्याय आहेत. गावात कर्नाटक टुरिझम (KSTDC) ने बांधलेले सुसज्ज हॉटेल आहे, जिथे डॉर्मेटरी ची व्यवस्था देखील आहे. तुम्ही हॉटेल चे आरक्षण इथून करू शकता.



# होयसळेश्वर मंदिराचा इतिहास



चेन्नकेशव मंदिरापासून २६ किमी दूर असलेल्या हळेबिडू गावी आपण आलो आहोत. द्वारसमुद्र नावाच्या मोठ्या तलावा शेजारी वसलेले हे कृषिप्रधान गाव कोणे एके काळी होयसळांची संपन्न राजधानी होती असे सांगितल्यास विश्वास बसणे कठीण. ह्या जलाशयातून भल्या थोरल्या मोटांद्वारे पाणी कालव्यात सोडले जाई, आणि त्यावर आसपासच्या गावांची तहान आणि शेतीची गरज भागत असे.

द्वारसमुद्र सरोवराच्या वायव्य तीरावर उभेआहे भारतातील सर्वात डौलदार मंदिरांपैकी एक मंदिर- होयसळेश्वर मंदिर.

श्रवणबेळगोळ येथे सापडलेल्या लेखातून आपणास असे समजते की विनयदित्याच्या काळातच द्वारावती (म्हणजेच द्वारसमुद्र किंवा हळेबिडू) चे शहर नियोजन आणि इमारतींचे बांधकाम सुरु झाले होते. आणि काही कारणांसाठी बेलूर वरून होयसळांची राजधानी द्वारावतीला हलवली गेली.

हे मंदिर विष्णुवर्धनाच्या काळात बांधले गेले ह्यात कोणतीही शंका नसली, तरीही बेलूरच्या चेन्नकेशव मंदिराप्रमाणे आपल्याला इथे मंदिराच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे फारसे शिलालेख सापडत नाहीत. घट्टाडहल्ली येथे सापडलेल्या इस ११२१ च्या शिलालेखावरून असे समजते, की हे मंदिर केटामल्ला नावाच्या वाणिज्य मंत्र्याने राजा-राणीच्या नावाने बांधून घेतले. संस्कृत आणि हळेकन्नड़ भाषेतला हा शिलालेख आपण मंदिरात पाहू शकता.




होयसळेश्वर मंदिर,
एडमंड डेव्हिड लियॉन,
सन१८६८

शिलालेखात विष्णुवर्धनाची प्रशस्ती असून, होयसळांच्या सर्वात महत्वाकांक्षी प्रकल्पाचे- होयसळेश्वर मंदिराचे काम केटामल्ला च्या देखरेखीखाली पार पडले असेही आपल्याला त्यावरून समजते. दक्षिण द्वाराजवळच्या एका शिलालेखात "मंदिराच्या तोरणाचे काम नृसिंह (पहिला) ह्याच्या मुख्य स्थपतीने (इ स ११४२मध्ये) केले", असा उल्लेख सापडतो.

जलाशयाच्या पूर्वेस (बस स्थानकाच्या मागे) असलेल्या बेन्नेगुडा नावाच्या छोट्याश्या टेकाडावर आपल्याला होयसळ कालीन राजवाड्याच्या जोत्यांचे अवशेष पाहायला मिळतात. इथूनच होयसळ राजांनी लष्करी आणि राजकारणाचे डावपेच आखले असतील. इथूनच त्यांनी कित्येक मंदिरांना सढळ हस्ते देणग्या दिल्या असणार. इथूनच त्यांनी न्याय्य शासन केले असेल, तो हा राजवाड्याचा भाग आता तणांची दुलई घेऊन निपचित- निर्मनुष्य पहुडलेला असतो. द्वारसमुद्रच्या पाण्यासारखीच ह्या राजधानीच्या शहराची कीर्ती, संपन्नता आणि महत्त्व इस्लामी आक्रमणाच्या दुष्काळानंतर हळूहळू आटत गेले, आणि आताशा हे गाव प्रसिद्ध आहे काही मंदिरांच्या भग्न अवशेषांसाठी.



# मंदिर रचना




**होयसळेश्वर मंदिर, हळेबिडू, कर्नाटक**

(सौजन्य: एपिग्राफिया कर्नाटीका, बी. लुईस राईस, म्हैसूर सरकारी प्रेस, सन १९०२)

चेन्नकेशव मंदिर आंतरिक सौंदर्यासाठी प्रसिद्ध, तर होयसळेश्वर त्याच्या बाह्य सौंदर्यासाठी ओळखले जाते. असे म्हणतात की बांधकाम पूर्ण होण्यापूर्वीच आक्रमकांच्या धाडीमुळे मंदिर नष्ट झाले. कदाचित त्यामुळेच मंदिराच्या आतील मूर्ती आणि खांबांवरील नक्षीचे कामही पूर्ण झालेले नाही आणि मंदिरावर कळस आजतागायत बांधला गेलेलाच नाही.

होयसळेश्वर मंदिर द्विकूट पद्धतीचे म्हणजेच दोन गर्भगृहे आणि दोन कळस असलेले, व्हरांडा अथवा ओसरीने संलग्न असलेले पूर्वाभिमुख जोड मंदिर आहे. ह्या पैकी दक्षिणेकडील मंदिराचे होयसळेश्वर हे नाव
विष्णुवर्धनावरून, आणि उत्तरेकडील मंदिर शांतालेश्वर हे राणी शांतलादेवी च्या नावावरून ठेवले गेले. दोनही गर्भगृहात महादेवाच्या सुंदर पिंडी आहेत.



मंदिराला उत्तर, दक्षिण आणि पूर्वेस दोन अशी एकूण चार प्रवेशद्वारे आहेत. मंडपांच्या पल्याड, पूर्व प्रवेश द्वारांच्या बाहेर प्रचंड आकाराचे एकाष्म नंदी त्यांच्या सुंदर नंदी मंडपात विराजमान आहेत. उत्तरेकडील नंदी मंडप १६ खांबांचा असून त्याच्या छतावर सुंदर कलाकुसर बघायला मिळते. दक्षिणेकडचा नंदी मंडप आणि त्यातील नंदी आकाराने थोडेसे थोरले आहेत. दोन्ही नंदी, त्यांची बैठक, त्यांचे उठावदार अवयव, त्यांचे दागिने मोठ्या राजेशाही थाटाचे. दक्षिणेकडील नंदी मंडपाला लागूनच पश्चिमाभिमुख सूर्य मंदिर आहे, ज्यात दोन्ही हातात कमळ धारण केलेला सूर्य, सात घोडे, सारथी आणि संधान केलेल्या उषा-प्रत्युषा ह्यांची अत्यंत रेखीव मूर्ती विराजमान आहे.     .

सोप-स्टोन चा वापर करून होयसळ स्थापत्य शैली नुसार उभे केलेले हे मंदिर सुमारे दोन मीटर उंचीच्या कंगोरेबद्ध अधिष्ठानावर उभे आहे. गाडी बाहेर उभी करून लुसलुशीत हिरवळीच्या वाटेने चालत गेल्यावर तुम्ही मंदिराच्या इमारतीपर्यंत पोहोचाल. चपला बाहेर ठेवून मंदिराकडे जा. बेलूर प्रमाणेच इथे सुद्धा प्रत्येक बाजूस दोन अशी वेसर शैलीतील उपमंदिरे तुम्हाला दिसतील. स्थापत्य शास्त्रानुसार वीरभद्र किंवा काळभैरव ह्या स्थानरक्षक देवता मंदिराचे संरक्षण करत असतात. मात्र येथे त्यांची तोडफोड करण्यात आल्याने अन्य काही भग्न मूर्ती येथे ठेवण्यात आल्या आहेत. उत्तरेकडील द्वारावर द्वारपाल नसल्याने तो भाग काहीसा बोडका वाटत राहतो. पायऱ्या चढून आल्यावर तुम्ही मंदिराच्या उत्तर मुखमंडपात दाखल होता.



वितानावरील नटराज
आणि अष्ट दिगपाल

मंदिराचे छत १०८ गुळगुळीत खांबांनी अलगद तोललेले आहे. खांबांवरचे कोरीवकाम इतके गुळगुळीत आणि त्याचबरोबर इतके तीक्ष्ण, की बोट फिरवल्यास कापले जाण्याची भीती. तुम्ही त्या गुळगुळीत काळ्या खांबांमध्ये तुमचे प्रतिबिंब पाहू शकता.



उत्तरेकडील द्वारातून प्रवेश केल्यावर तुम्ही उभे असता शांतलेश्वर महादेवासमोर. शांतलेश्वर मंदिराच्या गर्भ गृहाचे दरवाजे फक्त पूजेसाठी उघडले जातात. गर्भगृहासमोर एक रंगशिळा, आणि छतावरचे सुंदर नक्षीकाम. रंगशिळेभोवतीचे चार खांब जिथे छताला मिळतात तेथे एकापेक्षा एक सरस सुरसुंदरी तुमच्याकडे लक्ष ठेऊन असतात.

गर्भगृहाचे शैव प्रहरी आता जरी भग्न अवस्थेत असले, तरी त्यांच्या दागिन्यांची कलाकुसर पाहून थक्क व्हायला होते. त्यांच्या मुगुटात मानवी कवट्या बसवलेल्या आहेत, आणि हद्द म्हणजे ह्या पेराइतक्या छोट्या कवट्या आतून पोखरून रिकाम्या करण्यात आल्या आहेत. त्यांच्या एका डोळ्यातून बारीक काडी सारली असता दुसऱ्या डोळ्यातून ती चक्क बाहेर येते. पण हा दगड अत्यंत नाजूक असल्याने आता अश्या काड्या करण्यास परवानगी नाही ह्याची जिज्ञासूंनी नोंद घ्यावी.



## मंदिरांचा जोडमार्ग


दुसऱ्या गर्भगृहात जाण्यासाठी आपल्याला सुमारे पन्नास मीटर लांबीच्या, काहीश्या अंधाऱ्या ओसरीतून जावे लागते. वरच्या नक्षीकाम केलेल्या जाळीदार गवाक्षांमधून प्रकाश अलगदपणे आत सांडतो, आणि अंधाऱ्या बोळाच्या दोन्ही बाजूस असलेल्या गुळगुळीत खांबांवरून परावर्तित होत असतो. इतका प्रकाश आपल्याला दुसऱ्या गर्भगृहाकडे जाण्यास पुरेसा होतो. ह्या बोळात मध्यभागी आणखी एक छोटेसे गर्भगृह आहे, परंतु त्यातील देवता नसल्याने ते सध्या बंद असते.



दुसरे गर्भगृह आहे होयसळेश्वराचे. पूर्ण दिवस गर्भगृह दर्शनासाठी खुले असते. दोन्ही गर्भगृह अप्रतिम तोरणांनी अन रेखीव द्वारशाखांनी सजवलेली आहेत. दोन्ही तोरणांवर तुम्हास मकर, शार्दुल, नंदी आणि कीर्तिमुख यांसारखे प्राणी गर्भगृहाच्या तोरणाचे सौंदर्य वाढवताना दिसतील. मंडपाखालच्या रंगशिळेचे, आणि त्यावरील सुंदर वितानाचे दर्शन घ्या. भक्तिरसात न्हालेल्या शैव द्वारपाल आणि चवरी ढाळणाऱ्या दासींच्या सौंदर्याचे रसग्रहण करा. दोन्ही भोलेनाथांची आज्ञा घ्या, पुन्हा मंदिराच्या उत्तर दरवाज्याने बाहेर पडा आणि मंदिर उजव्या बाजूस ठेऊन प्रदक्षिणा सुरु करा.

# मंदिराचे थर

तुमची अवाढव्य मंदिरे आणि शिल्पे बघण्याची सवय इथे सोडावी लागेल, कारण ह्या देवळात शिल्प समजून घेऊन त्यांचे अवलोकन करण्यासाठी काहीश्या सूक्ष्म नजरेची आवश्यकता असते. आता मंदिरांच्या बाह्यथराचेच उदाहरण घ्या ना. सर्वात खालचा थर आहे गजथर-स्थैर्य आणि शक्तीचे प्रतीक. असे म्हणतात की ह्या नितांत सुन्दर मंदिराला १२४८ हत्तींनी आपल्या शक्तिशाली पाठीवर उचलून धरले आहे, पण एकही हत्ती दुसऱ्या समान नाही.






अगदी दोन जुळ्या भासणाऱ्या हत्तींमध्ये सुद्धा त्यांची लकब, दागिने, कानावरच्या किंवा सोंडेवरच्या वळ्या, सुळे, काहीतरी बारीक फरक हमखास आढळेलच.
त्यावरचा थर विक्राळ शार्दुल प्राण्यांचा. ते शौर्याचे प्रतीक. त्यावर एक वृक्षलतांचा छोटा थर आणि त्यावर होयसळांचे प्रबळ अश्वदल सामर्थ्य दाखवणारा थर. गजथर आणि अश्वथर एकत्र पाहिल्यास जणू होयसळांचे चतुरंग सैन्यदलच दिग्विजय करण्यास कूच करीत आहे असा भास होतो. अभाव फक्त नगारे, कर्णे, तुतारी, ढोल ह्यांचा. ती कमी वरच्या थरावरील वादक दूर करतात. हा थर वादक, आणि नृत्य विशारदांचा. ह्या थरावर काही ठिकाणी पुराणातील प्रसंग सुद्धा कोरलेले आढळतात.
मग त्यावर येतात मकर. हत्तीची सोंड, मगरीचे डोके, माकडाचे डोळे, बकऱ्याचे शिंग, हरणाचे कान, वराहाचे धड, मोराची शेपटी आणि सिंहाचे पंजे. ह्या अश्या प्राण्यांचे सामर्थ्य एकवटलेला प्राणी म्हणजे मकर. जणू एक आदर्श सैनिकच. मगरीसारखा, सावज एकदा जबड्यात पकडल्यावर कधीही न सोडणारा. एडक्या सारखा, धोक्याला शिंगावर घेणारा आणि हरिणासारखे तिखट कान असणारा, सतत धोक्याची चाहूल घेणारा. वराहाच्या कातडी सम निब्बर आणि जबर पचन शक्ती असलेला. सिंहाच्या पंज्याची ताकद असलेला आणि एका फटक्यात शत्रूला लोळवणारा सैनिक. त्याच बरोबर मोराच्या पिसांचे सौंदर्य असणारा. एकाच वेळेला जमिनीवर आणि पाण्यातून अती वेगाने प्रवास करणारे हे वाहन आहे, समुद्राचा आणि पश्चिम दिशेचा अधिपती असलेल्या वरुण देवाचे.
तदनंतर हंस पक्ष्यांचा थर.  मंदिरांच्या पूर्व भिंतीस जाळीदार खिडक्या असल्याने तिथे फारश्या मूर्ती मंडोवराच्या भागावर आपल्याला दिसत नाहीत. परंतु मंदिराची अर्धी प्रदक्षिणा पूर्ण करून, हे असे सुंदर थर बघत बघत तुम्ही येऊन धडकता देवळाच्या दक्षिण द्वारावर, आणि मग सुरु होते होयसळेश्वर मंदिराची खरी जादू.



## दक्षिण द्वार




तुमच्या समोर उभे असतात दोन शक्तिमान द्वारपाल, स्वतः च्या वजनापेक्षा जास्त भार असलेले अलंकार लीलया सावरीत. पुण्याच्या लक्ष्मी रोड वरील किमान दोन सोनारांची दुकाने सहज भरतील इतके दागिने घालून द्विभंग अवस्थेतील हे दोन शैव प्रहरी, अंगास राख फासून बसणाऱ्या वैरागी भोलेबाबांच्या घराचे अहोरात्र संरक्षण करत असतात. त्यांच्या मुखावर जरी हास्य असले, तरी त्यांच्या ओष्ठांतून डोकावणाऱ्या तीक्ष्ण सुळ्यांमुळे ते काहीसे विकट भासतात. त्यांचे मुगुट, रुंद खांद्यावर रुळणारे केशसंभार, अर्धोन्मीलित तीन नेत्र, वक्राकार रेखीव भुवया, मणिबंध, उदरबंध, मेखला, दंडावरची कीर्तिमुखे, पायातील वाळे, त्यांचे नक्षीकाम सारेच कल्पनातीत. दोघांचेही पुढील दोन हात तोडले गेले आहेत.मागच्या दोन हातात त्यांनी किर्तीमुखाचे अंकन असलेले डमरू आणि गदा पेललेली आहे, त्यावरचे नक्षीकाम सुद्धा मोहक नाजूकतेने घडवलेले.



इतक्या बारकाईने फक्त सुईच चालवली जाऊ शकते. बाकी हत्यारांचे हे काम नोहे. दगडात थिजलेले खरेखुरे शैव द्वारपालच आहेत की काय हे? कसली काळी जादू अवगत होती ह्या होयसळ लोकांना? वरचे मकर तोरण सुद्धा सौंदर्याच्या बाबतीत ह्या प्रहरींशी पैजा करणारे. मध्यभागी हाताशी तलवार धरलेल्या दानवावर सुहास्य मुद्रेत नृत्य करणारा शिव, आणि त्याच्या बाजूला वादनात तल्लीन झालेले वादक. महादेवाच्या मुगुटावर पाच फण्यांचा नाग.

ह्या सगळ्या शैव मंडळींच्या उजवीकडे, आणि महिरपीखाली ब्रह्मा अन डावीकडे विष्णू. त्यांच्या दोन्ही बाजूंना उभे असलेले विक्राळ मकर प्राणी. त्यांचा पिसारा इतका नाजूक, इतका तरल, जणू धुक्याच्या दोऱ्याने आणि हिऱ्याच्या सुईने विणलेला. मकरांवर मांडी ठोकून बसलेले वरूण देव आणि वरुणी देवी. वरूण राजाच्या डोईवरचे छत्र आणि हातातील पाश आवर्जून बघण्यासारखे. मकरांच्या तोंडातून निघणारी वलये वरच्या किर्तीमुखात लुप्त होतात आणि त्या वलयांचे महादेवांच्या डोईवर सुंदर छत्र निर्माण होते. असे अद्भुत दृश्य अनिमिष नेत्रात साठवणारे टीचभर उंचीचे दिगपाल आणि हे सगळे म्हणजे शिल्पकलेने ओलांडलेली परिसीमा...



# गणेश व कार्तिकेय

जेव्हा आपण मंदिराची प्रदक्षिणा दक्षिण दरवाज्यापासून सुरु करतो तेव्हा आपल्याला भेटतात मूषकावर उभे असलेले गणराज. हा एक शुभशकूनच. गणपतीचे डोके महादेवांनी जणू हत्तीवरून खुडून नुकतेच बसवले आहे की काय अशी शंका आपल्याला आल्याशिवाय राहत नाही, कारण त्याचे खऱ्याखुऱ्या हत्तीशी असलेले साधर्म्य. बाप्पाच्या सोंडेची कमनीय लकब, बारीक डोळे, कानावरच्या वळ्या, गंडस्थळावर झुलणारे मोत्यांचे घोस फारच सुंदर.



सहा हात असलेल्या वक्रतुंडाने आपला तुटलेला अर्धा सुळा उजव्या हातात धरलेला असून डाव्या हातात लाडूंची चळत असलेला वाडगा धरला आहे. तो वाडगा धरण्याची पद्धत, बोटांवरची नखे, वळ्या सारेच खरेखुरे भासणारे. 'जगदिदन् त्वत्तस्तिष्ठति' हे वचन खरे करणाऱ्या ह्या गणनायकाने बाकीच्या हातांमध्ये परशु, साप, कमल धारण केले आहेत.

किर्तीमुखाचे अंकन असलेला मुगुट, खांद्यावर रुळणारी माला, नागांचे यज्ञोपवीत, गुबगुबीत चरण आणि सर्व भार सहन करीत काहीसा जमिनीत धसत चाललेला मूषकराज असा ह्या शिल्पाचा थाट.
गणोबांच्या शेजारी त्यांचा लहान भाऊ कार्तिकेय. काहीश्या गंभीर मुद्रेचा, मिटल्या पिसाऱ्याच्या मोरावर सुखासनी आरूढ झालेला. देवांचा सेनापती असलेल्या कार्तिकेयाने पुढील दोन हातात अक्षमाला आणि शुभसूचक बीजपूरक धरलेले असून बाकीच्या हातांमध्ये परशु, भाला, वज्र, पाश धारण केलेले आहेत.



अर्जुन द्रोण संग्राम




गजेंद्रमोक्ष

# गौरीशंकर




प्रदक्षिणा मार्गात पुढे आहेत किर्तीमुखाच्या लयबद्ध महिरपीखाली विराजमान झालेले त्यांचे पालक. इथे शांतरसात न्हालेले शंकर पार्वती आपल्याला उमामहेश्वर आलिंगन मूर्तीच्या रूपात भेटतात. हराने त्याचा हात ज्या सहजतेने पार्वतीच्या खांद्यावर टाकला आहे, आणि ज्या रितीनी गौरीने तिचा उजवा हात त्याच्या पाठीमागे धरला आहे ती लकब आपल्याला त्या दोघातील सहज-सुंदर मोकळ्या नात्याविषयी बरेच काही सांगून जाते.

महादेवाने खालच्या हातात बोटांच्या चिमटीत जपमाळ धरली आहे. जवळपास अधांतरी असलेल्या त्या मालेतील मण्यांच्या पोताकडे काळजीपूर्वक बघा. अगदी हुबेहूब रुद्राक्षच.
वरच्या उजव्या हातात देवाने आखूड असा त्रिशूल धारण केला आहे, तर डाव्या वरच्या हातात डमरू. त्या डमरुवरचे कीर्तिमुख आणि दोऱ्यांच्या पिळाचे कोरीवकाम खऱ्या दोरखंडांशी स्पर्धा करणारे. उमेने तिच्या डाव्या हातात पुष्प धारण केलेले आहे. पार्वती जर गौरी रूपात असेल, तर तिच्या पायाखाली घोरपड कोरण्याची प्रथा आहे, ती घोरपड म्हणजेच गोधा तुम्ही इथे पाहू शकता. घोरपडीच्या शेजारी प्रणाम करत एक जण दिसतो, कदाचित तो नंदी असावा. शिल्पामधले दोघांचे दागिने हे डोळ्यांचे पारणे फेडतातच, परंतु शंकराच्या खांद्यावरचा त्याचा कुरळा केशसंभार आणि गौरीची वेणी केवळ अतुलनीय.

# त्रिमूर्ती



प्रदक्षिणेच्या पुढच्या टप्प्यात आपण भेटतो त्रिदेवांना. ब्रह्मा, महेश आणि विष्णूची एकमेकांच्या साथीने असणारी एवढी दुसरी सुंदर मूर्ती दक्षिण भारतात सापडणे कठीण. त्रिदेवांनी जांघिका किंवा अर्धोरुक नावाचे आखूड वस्त्र परिधान केलेले दिसते. प्रत्येकाची मुगुटाची ठेवण आणि निरनिराळी हत्यारे हातात धरण्याच्या शैली फारच वैशिष्ट्यपूर्ण. डावीकडे कमळावर उभ्या असलेल्या अर्धोन्मीलित नेत्रांच्या ब्रह्माची दाढी आणि पल्लेदार मिश्या फारच उठावदार. त्रिमुखी ब्रह्माने अंगठा आणि तर्जनी मध्ये ज्ञान मुद्रेत अगदी अलगद जपमाळ पकडली आहे. ती इतक्या सुंदर पणे, की वाऱ्याच्या झोताबरोबर ती हालत असेल काय अशी शंका मनाशी येते. दुसऱ्या हातात ब्रह्माने स्त्रुक आणि पाश धरले आहेत. तिसरा हात कदाचित मुद्रेत असावा किंवा त्याने कमंडलू धरला असावा, पण आताशा तो भग्न झाल्याने अंदाज लावता येत नाही.

होसळेश्वर मंदिर महादेवाचे. म्हणून ह्या उत्पत्ती, स्थिती आणि लय दाखवणाऱ्या ह्या त्रयींत मध्यभागी भगवान शंकर उभे असतात. स्फुट हास्य, अर्धवट मिटलेले तीन डोळे, धनुष्यासारख्या वक्राकार भुवया हे सर्व शिल्पाच्या देखणेपणात भर घालतात. शंकराने मुगुटावर तक्षकाला धारण केले असून कानात कम्बल आणि अश्वतर नावाचे साप आहेत. महादेवाच्या अंगावर एकेकाळी वनमाला असावी, त्याचे अवशेष आपण त्यांच्या गुडघ्याखाली पाहू शकतो. जपमाळ, त्रिशूल, डमरू आणि ओंजळीत पकडलेले कणीस आवर्जून बघण्यासारखे. कणीस (बीजपूरक) धारण केलेला त्यांचा उजवा हात, त्यावरची लांबसडक बोटे, नखे, बोटातील अंगठ्या, फळावरचे बारीक टपोरे दाणे हे सर्वच मोहक.

तिसरा विष्णू. त्याची सौंदर्याबाबतीत पहिल्या दोघांशी स्पर्धाच. त्याने उजव्या समोरील हातात वन्हिशिखाकारा कौमोदकी गदा धरली असून वरील हातात अत्यंत सुंदर कमल धारण केलेले आहे. वरच्या डाव्या हातात त्यांनी पाञ्चजन्य शंख धरलेला असून खालील डाव्या हातात सुदर्शन चक्र धरलेले दिसते. त्यावरील गियर्स तर केवळ कमाल.




कर्णार्जुन संग्राम

# मुरलीधर




त्यानंतरची महत्वाची मूर्ती म्हणजे मुरलीवादनात मग्न झालेला कान्हा. अर्धसम शैलीत उभ्या असलेल्या कृष्णाचा हा शिल्पपट सूक्ष्म तपशिलाने भरलेला आहे. इथे कमलावर उभ्या असलेल्या कृष्णाच्या सभोवताली जमा झालेले गोधन दिसेल. अगदी प्राण कानाशी आणून आणि नजर एकवटून गाई, त्यांच्या आचळाजवळची वासरे त्यांच्या लाडक्या कान्हाची बन्सी ऐकण्यात दंग आहेत. इतकेच काय, हरणे आणि त्यांची शिकार करणारे हिंस्त्र पशु सुद्धा ते दैवी वादन ऐकत शांत उभी आहेत. आखूड धोतर नेसलेले, आणि काठीचा आधार घेतलेले गोप आणि गोपी त्याच्या बासरीने मंत्रमुग्ध झाले आहेत.

# गोवर्धन गिरिधारी



कृष्ण आणि गोवर्धनाची गोष्ट सगळ्यांनाच ठाऊक आहे. पण गोवर्धन गिरिधारी चे हे कथन शिल्प म्हणजे शिल्पीने तुमच्या निरीक्षणाला दिलेले खुले आव्हानच. तोफेत दारू ठासून भरावी तसे बारकावे शिल्पीने ह्या शिल्पात भरून ठेवले आहेत. जसे जसे आपण हे शिल्प न्याहाळत जातो, तसे तसे हे बारकावे आपल्या डोक्यात आकलनाचे बारीकसे स्फोट करीत जातात.

आता गोवर्धन उचलणाऱ्या ह्या ब्रिजेशालाच बघा ना. किती सहजतेने त्याने डोईवर हा पर्वत उचललेला आहे. त्याचा प्रशांत चेहेरा, उभे राहण्याची ढब, खाली सोडलेला उजवा हात म्हणजे मूर्तिमंत सहजता.

खालच्या मजल्यावरची उजव्या बाजूची गायींची गर्दी किती सुंदर रित्या मुर्तीकाराने दाखवली आहे. त्यावरचे दोन गोपाळ खांद्यावर काठी अडकवून चिंतेचा सगळा भार श्रीहरीवर सोपवून निवांत उभे आहेत. पल्याडचे चार गोपाळ सुद्धा कान्हाकडे बघत आहेत. त्यातल्या दुसऱ्या गोपाळने काठीवर जसा पाय अडकवला आहे त्याला तोड नाही. त्याच्या शेजाऱ्याने त्याच्या खांद्यावर हात टाकला आहे. गोकुळावरचा एवढा बांका प्रसंग. पण ह्या मुरलीवाल्याच्या छत्रछायेत जीवाचे भय विसरून गोकुळवासी भजनात दंग आहेत. आणि ह्यातच त्या भोळ्या भाबड्या गोकुळ वासियांचा त्यांच्या कान्हावर असलेला अडिग विश्वास प्रगट होतोय. ह्या गोपालांच्यात एक शिल्प-श्लेष पण साधला गेलाय. बघा तुम्हाला सापडतोय का.

पण एवढ्यात पुढे सरकू नका. तुम्हाला अजून गोवर्धन न्याहाळायचाय. काय आहे ह्या डोंगरात? आंब्याची, पळसाची झाडे. केळीची झाडे आणि त्याला लगडलेले केळ्यांचे घोस. पलीकडच्या झाडावरून त्या केळ्यांकडे आशाळभूत नजरेने पाहणारे माकड. धनुष्यबाण घेऊन शिकार साधणारा व्याध. क्रीडा करणारे पक्षी, आणि पत्थराला चिकटलेली घोरपड. डोंगरातल्या गुहेत आत जाणारे श्वापद आणि नुकतीच केलेली शिकार घेऊन जाणारा वाघ. डोंगर कड्याशी लगट करून वरती चढणारा, लंगोट नेसलेला आदिवासी. डोंगर उचलल्याने डोंगराच्या पायथ्याला बिळात राहणारे नाग बाहेर येऊन अश्या पद्धतीने लटकत आहेत, जणू त्या आदिम डोंगर पुरुषाच्या जटाच.

# गजासुर संहार



भीषण युद्धात गजासुराने स्वतः चा आकार मायेने मोठा करून महादेवाला गिळून टाकले. असुराच्या पोटात जाताच महादेव अत्यंत क्रोधीत होऊन त्यांनी आपले भयानक तांडव नृत्य सुरु केले आणि पोटातील वेदना असह्य होऊन गजासुर किंकाळ्या फोडू लागला. तो ओरडत असताना भोलेनाथाने राक्षसाला आतून उभ्यानेच फाडले आणि त्याचे कातडे अंगावर पांघरले. त्यालाच गजासुर संहार रूप असे म्हणले जाते.

हा प्रसंग हळेबिडू येथील दगडात अजरामर करून ठेवला आहे. हळेबिडू मधील आठ हाती महा क्रुद्ध महादेव, भान हरपून हत्तीच्या डोक्यावर तांडव नृत्य करीत आहेत. नीलासुराचे (गजासुर) खालचे पाय पट्ट्यांनी सजवलेले आहेत. गंडस्थळावर मोत्यांची सुंदरशी झूल हिंदोळत आहे. हत्तीच्या पायांची नखे मोठी उठावदार दिसत आहेत. महादेवाच्या असह्य भाराने गजासुर राक्षसाचे डोळे वेदनांनी जणू बाहेर येत आहेत.

शंकराने एक उंच मुगुट घातला आहे ज्यावर अनेक लहान आकाराच्या मानवी कवट्या आहेत. त्यानी दंडावर मोठे शोभिवंत कीर्तिमुख धारण केले असून त्याच्या लांबसडक बोटांमध्ये अनेक अंगठ्या आहेत. मोठ्या ऐटीत झुलणारी वनमाला आणि मेखला त्याच्या नृत्याची लय दर्शवित आहे. त्याचे गण त्याच्यासोबत ढोल वाजवत आहेत आणि नंदी त्याच्या उजव्या बाजूला बाहेर पाहत आहेत.

मागच्या दोन हातांनी त्यांनी राक्षसाचे मागचे दोन पाय अत्यंत सहजतेने डोक्यावर तोलून धरले आहेत. आपण जर बारकाईने निरीक्षण केलेत तर त्यांच्या डाव्या हाताच्या बोटाचे नख हे गजासुराच्या जाड कातडीच्या आरपार जाऊन अडकून बसलेले आपणास दिसेल. त्यांच्या एका हातात ब्रह्माचे मुंडके आणि कपाल पात्र असून दुसऱ्या हातात किर्तीमुखाने नटलेला डमरू आहे. उजवीकडील हातांत त्यांचे प्रलयंकारी त्रिशूल आणि खडग असून बाकीचे दोन हात नृत्य मुद्रेत आहेत. क्रुद्ध महादेवाच्या तोंडातुन बाहेर डोकावणारे सुळे तुम्ही बघू शकता. ह्या अश्या अत्यंत अवघड नाट्यमुद्रेत इंद्रियजयी आदीयोगी भगवान शिव कमालीचे स्थिर दिसत आहेत. ते जणू ह्या अशक्यप्राय विश्वाचे संतुलन सांभाळत आहेत.

# द्वादशभुज वराह




पुढचे शिल्प आहे द्वादशभुज वराहाचे. का कोण जाणे, पण विष्णूचा हा अवतार भक्तांशी अंमळ अंतर राखूनच असतो. मध्यन्तरी गुप्त काळात तो पूजनीय असावा, पण त्यानंतर हा नृवराह आपल्याला प्रामुख्याने भेटतो तो मंदिरांच्या खांब अथवा भिंतींवरच. तब्बल बारा हात असलेल्या वराहाने भूदेवी ला डाव्या खांद्यावर उचलून घेतले आहे. भूदेवीने उजव्या हातात पुष्प तर डाव्या हातात मंगल कलश धारण केलेला दिसतो.

वराहाच्या पुढील डाव्या हातावर भूदेवीने आधारासाठी डावा पाय अलगद पणे ठेवला आहे. वराहाच्या हातांत गदा, अंकुश, वज्र, सुदर्शन, शंख आणि बीजपूरक तुम्ही पाहू शकता.
वराहाच्या उजव्या हातातील गदेने राक्षसावर प्राणांतक वार झाला असून गदेचे टोक राक्षसाच्या आरपार गेलेले तुम्हाला दिसेल. त्या राक्षसाच्या यातना तिथेच थांबलेल्या नाहीत, कारण वराहाच्या वरच्या हातातील अंकुश त्या राक्षसाच्या मुखात माशाच्या काट्यासारखा गाडला गेला आहे. आलीढासनातील त्याचा डावा पाय हिरण्याक्ष दानवाच्या मस्तकावर आहे. विस्फारलेल्या भुवया, बाहेर येणारे डोळे, उजव्या हातात कशीबशी सांभाळून ठेवलेली तलवार आणि डोक्याखालचा डावा हात ह्यातून शिल्पीने त्या राक्षसाच्या आयुष्याचे शेवटचे काही क्षण, त्याला वाटणारे भय आणि पश्चात्ताप फार सुंदर तऱ्हेने दाखवले आहेत.

# उग्र नृसिंह



थोड्या अधिक प्रमाणात का होईना, प्रल्हाद - नरसिंहाची कहाणी सर्वांना ठाऊक आहे. परंतु, होयसळ मंदिरांना भेट दिल्या नंतरच नरसिंहाला उग्र-उग्र ते का म्हणतात हे समजेल. होयसळांचे कुलदैवत नरसिंह. सामर्थ्य, पराक्रम, धर्म, आणि धैर्याचे प्रतीक. आपल्याला होयसळांच्या प्रत्येक देवळांवर, प्रवेशद्वारावर, मंदिरांच्या आत, खांबावर, मंदिरांच्या बाहेरील भिंतींवर आणि अगदी छतावरच्या झुंबरांच्या मधोमध सुद्धा नरसिंह भेटतात. इस्लामिक आक्रमकांच्या हातोड्याखाली आल्याने हे शिल्प जरी भग्नावस्थेत असले, तरीही त्याचे रौद्र सौंदर्य काही नष्ट झालेले नाही.
नृसिंहाच्या उजव्या हातातील बहुतांश शस्त्रे नष्ट झाली आहेत. पण डाव्या हातात तुम्ही ढाल, वज्र, शंख, पद्म, धनुष्य बघू शकता. हिरण्यकश्यपू ने डाव्या हातात ढाल धरली आहे. पण तो हात नृसिंहाने त्याच्या डाव्या मांडीखाली जखडून ठेवला आहे. भयाने आणि आत्यंतिक वेदनेने हिरण्यकश्यपू चे डोळे विस्फारले गेले आहेत, सुळे बाहेर आलेले आहेत अन तो किंकाळ्या फोडीत आहे. आपण जर ह्या शिल्पासमोर थोडा वेळ उभा राहिलात, तर ह्या किंकाळ्यांचे प्रतिध्वनी आपणासही नक्की ऐकू येतील.
शिल्पाच्या उजव्या कोपऱ्यात आपण विष्णूचे वाहन असलेल्या गरुडाला पाहू शकता, जो हिरण्यकश्यपू च्या ढालेला ढाल भिडवून काहीसा दिग्मूढ होऊन हिरण्यकश्यपू कडे बघत उभा आहे. तुम्ही त्याला त्याच्या चोचीसारख्या टोकदार नाकाने सहज ओळखलं असेल. विष्णूचे हे असे विक्राळ रूप त्याने पाहिलेले नाहीये. पण मूर्तिशास्त्रातील एक बेजोड अश्या कल्पकतेचे उदाहरण तुम्ही बघाल शिल्पाच्या डाव्या कोपऱ्यात.
हिरण्यकश्यपू च्या सेनेतल्या एका राक्षसाचा चेहेरा नरसिंह आपल्या तीक्ष्ण नखांनी फाडीत आहे. तो ओरबाडताना कातडीबरोबर त्याचे डोळे चेहेऱ्याच्या कातडीला चिकटून बाहेर आलेले आहेत. अन ह्या भयंकर क्रौर्याने राक्षसाच्या चेहेऱ्या जागी केवळ त्याची कवटी आणि डोळ्यांच्या रिकाम्या खोबण्या दृष्टीस पडत आहेत अशी कल्पना शिल्पकाराने इथे केलेली आहे त्याला तोड नाही. त्या दीनवाण्या दानवाखाली राक्षसराज्ञी कयाधू आणि प्रल्हाद देवाला नमन करत उभे आहेत.



## वामन आणि त्रिविक्रम

पुढचे शिल्प म्हणजे वामन आणि बळीराजाची गोष्ट. लंगोट नेसलेला तुंदिलतनु वामन डाव्या हातात छत्र घेऊन उभा आहे. नक्षीदार यज्ञोपवीत त्याच्या खांद्यावर रुळतंय. चेहेऱ्यावर नम्रता आहे, आणि उजवा हात दान स्वीकारण्यास पुढे आलेला आहे. त्याच्या पुढ्यात आहे राक्षस बळीराजा.




त्याचे पुढे आलेले दात सोडल्यास त्याचा पेहराव, त्याच्या चेहेर्यावरील हावभाव हे एखाद्या भक्ताला साजेसे असेच."अहंकाराचा वारा न लागो राजसा, माझ्या विष्णुदासा भाविकांसी" ह्या संत नामदेवांच्या उक्तीप्रमाणे इतुके मोठे दान, तेही बटुरूपातील विष्णूस देताना, त्याच्या चेहेऱ्यावर गर्वाचा लवलेशही सापडत नाही. दानानंतर पाणी सोडण्यासाठी त्याने दोन हातात एक सुंदर कुंभ धरलेला आहे, आणि त्यातून तो देवाला जगाचे दान देत आहे. उजव्या कोपऱ्यात दैत्यगुरू शुक्राचार्य त्याला दान देण्यापासून आडवत आहेत. ह्या शिल्पाची ठेवण, सौंदर्य बाकीच्या मूर्तींप्रमाणेच आखीव आणि रेखीव आहे. पण ह्या कथन पटात शिल्पी आपल्याला एक मोठा संदेश देऊन जातो. इथे वामन, बळी आणि शुक्राचार्य ह्यांचे आकार मुर्तीकाराने वेगवेगळे का दाखवलेले असतील?

जो दान देतो, तो सर्वात श्रेष्ठ, म्हणूनच बळीराजा ह्या तिघांत सर्वात उंच कोरलेला आहे. जो दान घेतो तो दान देणार्यापेक्षा कमी उंचीचा, म्हणून वामन कमी उंचीचा. जो सत्पात्री दानास विरोध करतो तो सर्वात लहान, म्हणून दैत्यगुरूंचे अंकन खुज्या मूर्तीत केलेले आहे. ह्या शिल्पपटाच्या पुढचा महत्त्वाचा पट म्हणजे <u>त्रिविक्रम</u>.    .




त्रिविक्रम



कुठल्याही बळाचा वापर न करता केवळ युक्तीच्या बळावर राक्षसावर विष्णूने दिलेली ही मात. दान दिल्यानंतर विष्णूने आपला वामन अवतार सोडून त्रिविक्रम अवतार धारण केला. पहिल्या पावलात संपूर्ण पृथ्वी आणि दुसऱ्या पावलाने स्वर्ग धारण केला, तरीही त्रिविक्रम वाढतच गेला. इथे श्रीहरी विष्णू मोठा होत होत ब्रह्म लोकांपर्यंत जाऊन पोचला आहे.

कीर्तिमुख आणि मकर कमानीच्या खाली उभ्या असलेल्या विष्णूने पद्म, गदा, चक्र आणि शंख धारण केले आहेत. गदा, पद्म आणि शंखावरील कलाकुसर पाहण्यासारखी. त्याच्या धोतरावरच्या निऱ्या अन सुदर्शन चक्राचे गियर्स तर अप्रतिम. इस्लामिक आक्रमकांनी जरी मूर्ती फोडण्याचा प्रयत्न केला असला, तरी राहिलेले अवशेष बरेच काही सांगून जातात.

असा अलौकिक पराक्रम करूनही त्रिविक्रमाच्या चेहेऱ्यावर अत्यंत सहज भाव आहेत. त्याच्या बारीक भुवया आणि अर्धोन्मलित पापण्यां हे त्याची सहजता प्रकट करतात. त्याचा उजवा पाय ब्रह्मलोकात गेलेला आहे. तिथे त्रीमुखी चतुर्हस्त ब्रह्मा ढगांवर बसलेला आपल्याला दिसतो. एका हातात त्याने अमृत कलश घेतलेला असून दुसऱ्या हातात त्याने वेद धारण केलेले आहेत. तिसऱ्या हाताने जणू तो श्रीहरी विष्णू ची पाद्यपूजा करून त्याचे पाय धुवत आहे .

पाद्यपूजा करून जो पाण्याचा प्रवाह तयार झाला आहे त्याची एक नदीच निर्माण झालेली आहे. नदीतले मासे, कासवे, आणि नदीवरील प्रवाह अत्यंत रंजक पद्धतीने मुर्तीकाराने दाखवले आहेत. प्रवाहाच्या खाली आपल्याला गरुड हात जोडून बसलेला बघायला मिळेल. त्याचे पंख, दागिने, बाहेर आलेले सुळे आणि आपल्या धन्याचा न भुतो न भविष्यती पराक्रम पाहून कौतुक मिश्रित आश्चर्याने विस्फारलेले डोळे. सारीच कलाकुसर, सगळेच बारकावे तुमची दाद मागत असतात.



# कृष्ण इंद्र पारिजात संग्राम

समुद्र मंथनातून उत्पन्न झालेल्या पारिजात झाडाला इंद्र आणि त्याची अर्धांगिनी सची ने आपल्या इंद्रपुरी अमरावतीत लावले आणि त्याचे मोठ्या प्रेमाने आणि अभिमानाने संगोपन केले. सोन्यासारखे दिव्य खोड, रत्नांसारखी फळे असण्याऱ्या पारिजात वृक्षाचा विलक्षण परिमल तिन्ही लोकात पसरू लागला, साधू, देव देवता आणि तपस्वी लोक त्याचे दर्शन घेण्यास येऊ लागले.




बऱ्याच वर्षांनी कृष्ण सत्यभामेला घेऊन गरुडावर बसून तडक स्वर्गात दाखल झाला, आणि त्याने आपल्या प्रिय पत्नीसाठी, इंद्र आणि सचीकडे तो वृक्ष मागितला. आपल्याकडे असलेल्या त्या दैवी झाडाचा गर्व झाल्याने इंद्र आणि सची ने कृष्णाची मागणी सपशेल धुडकावून लावत सांगितले, की कोणत्याही मर्त्य मानवाची हा वृक्ष जवळ बाळगण्याची लायकी नाही. हा वृक्ष जर पृथ्वीवर गेला, तर स्वर्ग-पृथ्वी, मानव-देव ह्यांच्यात काही फरकच राहणार नाही.

हे ऐकल्यावर तो यदुराज तडक झाडाकडे गेला, आणि त्याने ते झाड अगदी मुळासकट सहज उपटले. झाड खांद्यावर घेऊन तो सत्यभामेसह गरुडावर स्वार झाला. हे पाहून चिडलेल्या इंद्राने, कृष्णाला लढाईचे आव्हान दिले आणि मग सुरु झाला इंद्र कृष्णाचा संग्राम. सात्यकी, प्रद्युम्न आणि दारूक सारख्या महारथींनी स्वर्गावर आक्रमण केले. ऐरावतावर स्वार झालेल्या इंद्राच्या बाजूने इतर देवगण, आणि जयंत आणि प्रवरासारखे अतिरथी त्यांचा सामना करू लागले, आणि वापर सुरु झाला संहारक अश्या अस्त्रांचा. एका वृक्षापायी एक महायुद्ध पेटले, आणि त्यात दोन्ही बाजूंचे योद्धे जखमी होऊ लागले.

हा प्रसंग हळेबिडू येथे शिल्पकाराने मोठ्या कल्पकतेने शिल्पित केला आहे. इथे डाव्या बाजूला तुम्ही पंख असलेल्या गरुडावर स्वार झालेले यदुश्रेष्ठ कृष्ण आणि सत्यभामा बघू शकता. कृष्णाने हातात पद्म आणि शंख घेतले असून तिसऱ्या हाताने तो सत्यभामेला सांभाळीत आहे. टोकदार नाक असलेल्या गरुडाने आपल्या उजव्या हातात एक अस्त्र धरले असून डाव्या हातात त्याने पारिजात झाडाचे खोड धरले आहे. मुर्तीकाराने, झाडावर अत्यंत सुबकतेने बारकावे चित्रित केले आहेत. फुलांच्या गुच्छांबरोबरच पारिजात झाडाला सुंदर फळे लगडली आहेत आणि ते खाण्यासाठी फांद्यांवर पक्षी बसलेले आहेत.खोडाच्या खाली अस्ताव्यस्त पसरलेली, आणि वाऱ्याने भिरभिरणारी मुळे सुद्धा आपण पाहू शकता.

उजव्या बाजूला चार सुळ्यांच्या ऐरावतावर इंद्र आणि सची स्वार झालेले आहेत. ऐरावताने धारण केलेले दागिन्यांचे बारकावे विस्मयकारक आहेत. इंद्राने उजव्या हातात त्याचे प्रसिद्ध इंद्र वज्र तोलून धरले असून डाव्या हातात बहुधा अंकुश आहे. ऐरावत अत्यंत क्रोधीत झाला असून त्याचा क्रोध त्याच्या डोळ्यातून, फडफडणाऱ्या कानांवरून आणि उभ्या शेपटीवरून जाणवत आहे. अति वेगामुळे इंद्राच्या मागे बसलेली सची हवेत उचलली गेली आहे. हे शिल्प कोरण्यात होयसाळांचा हातखंडा होता असे म्हटले तर वावगे ठरू नये, कारण हे शिल्प भारतात बाकी मंदिरांमधून फारसे दिसत नाही. असेच शिल्प म्हैसूर पासून चाळीस किलोमीटरवर असणाऱ्या सोमनाथपूर देवालय येथेही पाहायला मिळते.

# अंधकासुर वध




इथे तुम्हाला एक प्रशांत महादेव भेटतात. फक्त त्याच्या चेहऱ्यावर एक नजर टाका. अर्धोन्मलित डोळे, चेहऱ्यावर मंद स्मितहास्य आणि धनुष्यासारख्या निवांत भृकुटी या भगवंताची सहजता दर्शवतात. इतक्या भयंकर दानवाचा पराभव त्यांनी किती सहजरित्या केला आहे, हे त्यांच्या वदनावरून आपल्याला दिसते. चौदा हात असलेल्या महादेवाच्या हातात खटवांग, बाण, भाला, धनुष्य, तलवार, त्रिशूळ अशी विविध आयुधें आहेत.  त्या शस्त्रांव्यतिरिक्त, महादेवाने त्यांचा प्रसिद्ध डमरू, आणि रुद्राक्ष जपमाळ धारण केली आहे.

त्याच्या वरच्या डाव्या हातात तुम्हाला वेद दिसतील. त्याच्या खालच्या वामहस्ती त्याने अंधकासुरमधून वाहणारे रक्ताचे थेंब गोळा करण्यासाठी कपाल (वाडगा) धरला आहे.
वरच्या उजव्या कोपऱ्यात तुम्हाला अंधकासुर दिसेल. पोटावर ज्या जागेत त्रिशूल खुपसला गेला आहे, तिथली कातडी फाटून लोंबते आहे. त्याच्या उजव्या हातात खड्ग आणि डाव्या हातात ढाल आहे. शिल्पातील बारकावे तर केवळ अप्रतिम. शंकराच्या प्रत्येक हातातील प्रत्येक लांबसडक बोटांची नखे, बोटांवरील अंगठ्या, प्रत्येक दागिन्यावरचे नक्षीकाम, रुद्राक्ष मालेतील रुद्राक्ष, खटवांगाची मोकळी कवटी आणि त्या मोकळ्या कवटीतून बाहेर येणारा सर्प म्हणजे केवळ अतिरमणीय कलाकुसर.
महादेव दुसऱ्या एका राक्षसावर नाचत आहेत. देवाच्या असह्य वजनामुळे खाली सापडलेल्या राक्षसाचे फुगलेले डोळे तुम्ही स्पष्टपणे पाहू शकता. तळाशी डाव्या कोपऱ्यात, तुम्ही नंदी पाहू शकता. नंदीचे रुंद डोळे, वक्र भुवया, टवकारले कान, डोळ्यांखालची उडत असलेली शीर, उघडे तोंड आणि त्यातील दात पाहून तुम्हाला नंदीचा क्रोध जाणवतो.
नीलकंठाच्या अंगठ्या, दंडावरचे आणि मनगटाचे पट्टे अद्भुत नक्षीकामाने नटले आहेत. डोईवरच्या मुगुटाची कलाकुसर तर मनोहर. त्याच्या उदरबंधावर छोटे कीर्तिमुख विराजमान आहे. त्याच्या डाव्या खांद्यावर येऊन गुडघ्याच्या खाली आलेली वनमाला, त्याच्या शरीराच्या हालचालीनुसार जणू डोलताना दिसते. वनमालेच्या शेजारी नाजूक घंटा कोरलेल्या आहेत. जर तुम्ही शिल्पासमोर आणखी काही वेळ घालवाल तर त्या घंटारवाचा सुमधुर नाद तुम्हाला ऐकू येईल. शेकडो वर्षांपूर्वीच्या माणसाने नुसत्या छिन्नी हातोडीने काळ्या पत्थरात हे काम केलेले आहे ह्यावर विश्वास बसणे केवळ अशक्य.



नृत्यशिव







कार्तिकेय

डालमालिका



मयुरारूढ कार्तिकेय

लक्ष्मीनारायण





चतुर्हस्त गरुड

# रावणानुग्रह




हिमालयावरून जात असताना एका प्रचंड पर्वत शिखराजवळ दशाननाचे पुष्पक विमान अडले. तो पर्वत म्हणजे शिवपार्वती चा कैलास. सगळ्या हातांची शक्ती पणाला लावून त्याने कैलासालाच हात घातला आणि सबंध कैलास पर्वत त्याने उचलून डोक्यावर घेतला. ध्यानात आकंठ बुडालेल्या महादेवाचे डोळे पर्वत डळमळीत झाल्याने उघडले अन एका क्षणात त्यांना काय चालले आहे ते उमजले. स्मित हास्य करीत भोलेनाथांनी आपल्या उजव्या पायाच्या नुसत्या करंगळीच्या टोकाने कैलास दाबायला सुरवात केली. भोलेनाथांच्या असिमीत, अती प्रचंड शक्तीपुढे त्या राक्षसाचा काय टिकाव? दशानन पर्वताखाली चिरडू लागला आणि भयंकर किंकाळ्या फोडू लागला. तेव्हापासून दशानन - रावण (राव म्हणजे किंकाळी, रावण म्हणजे ओरडणारा) नावाने तिन्ही लोकांत ओळखला जाऊ लागला. रावणाने भोलेनाथांना प्रसन्न करण्यासाठी तलवार उपसली आणि...

आपले एक डोके, स्नायू अन हाड कापले. त्यापासून त्याने बनवले एक तंतूवाद्य. आणि तो गाऊ लागला

जटा टवी गलज्जलप्रवाह पावितस्थले गलेऽव लम्ब्यलम्बितां भुजंगतुंग मालिकाम्।
डमड्डमड्डमड्डमन्निनाद वड्डमर्वयं चकारचण्डताण्डवं तनोतु नः शिव: शिवम् ॥

रावणाची भक्ती पाहून भोलेनाथ प्रचंड खुश झाले. त्यांनी रावणाला मोठ्या उदार मनाने क्षमा केली. भोलेनाथांनी स्वतः चे चंद्रहास नावाचे भयंकर खड्ग रावणाला भेट म्हणून दिले. आणि अश्या रीतीने झाला जन्म प्रसिद्ध शिव तांडव स्तोत्राचा. हजारो वर्षांनंतर अजूनही आपण हे एका दानवाने रचलेले गीत, शंकराची स्तुती म्हणून, कुठलाही देव -असुर असा भेदभाव न करता गातो.
हळेबिडू च्या होयसळेश्वर मंदिरावर एका अनामिक कलाकाराने आपली संपूर्ण तपश्चर्या पणाला लावून हा प्रसंग शिल्पित केला आहे. चौदा हात आणि पाच मस्तके असलेला रावण विविध आभूषणांनी सुसज्जित आहे. त्याने हातात विविध आयुधे धारण केली असून एका हाताने तो तलवार म्यानातून बाहेर काढत आहे. त्याच खड्गाने तो स्वतः चे शीर महादेवांना अर्पण करणार आहे. त्याने जो कैलास पर्वत डोक्यावर धरला आहे, त्यातील बारकावे तर अतीव अद्भुत आणि सुंदर आहेत. चार काल्पनिक मजले असलेल्या कैलासावर यक्ष, किन्नर, अष्ट दिगपाल, विविध प्रकारचे वृक्ष, प्राणी आदी संचार करीत आहेत. सर्वात वरती उमा आणि त्रिशूल धारी महेश्वर मंचकारूढ आहेत. त्यामागे कार्तिकेय सुद्धा आपण पाहू शकता. महादेवांनी आपला उजवा पाय अलगद जमिनीवर ठेवला आहे, आणि तो भार रावणाला असह्य झाला आहे. रावणाचा एक गुडघा अति दाबाने जमिनीत धसत चालला असून त्याचे डोळे बाहेर आले आहेत. ओरडण्या करिता त्याने तोंड उघडले आहे, आणि त्यामुळे त्याचे सुळे बाहेर आले आहेत.






एकदंत लंबोदर




शांतालेश्वर नंदी







महिषासुर मर्दिनी

नृत्यरत सरस्वती (वर)
कमला (खाली)

पाच तोंडाचा, बारा हातांचा रावण शरवृष्टी करताना दिसतो. उजवीकडील रथात कोदंडधारी प्रभू श्रीराम आणि सारथी मातली दिसत आहेत.

मध्यभागी कोणी वानरवीर (कदाचित महाबळी हनुमंत) पायाखाली राक्षस ठेऊन हातात झाड घेऊन लढत आहे. पुच्छ ते मुरडिलें माथा ह्या समर्थांच्या उक्तीप्रमाणे मारुतीरायाने पल्लेदार शेपटीने एका राक्षसास हवेत उचलले असून दुसऱ्याला जखडले आहे.

राम रावण संग्राम







<u>कुरुक्षेत्रात</u> मृत हत्तींचा ढिगारा आकाशातील ढगांपर्यंत रचणारा भीम



भीम,
अभिमन्यू, द्रोण
आणि
चक्रव्यूव्ह



मकरारूढ
वरुण-वरुणी



<u>सात झाडे भेदणारे
प्रभू राम</u>


आणि

वाली-सुग्रीव
द्वंद्व

भैरव, आणि प्रेतगण




तुटलेल्या मुंडातून ठिबकणारे रक्तप्राशन करणारी प्रेतिनी आणि तिचे दुग्ध प्राशन करणारे तान्हे प्रेत बालक






सुमुख नागासह गरुड

# कीर्तिमुख

पार्वतीच्या सौंदर्याची स्तुती ऐकून महा शक्तिशाली जलंधर राक्षसाने पार्वतीस लग्नाची मागणी घालण्यास राहू ला आपला दूत म्हणून पाठवले. राहू कैलासावर गेला, आणि त्याने जलंधरासाठी पार्वती ला मागणी घातली, हे ऐकून संतापलेल्या भोलेनाथांच्या तिसऱ्या डोळ्यातून एक भीषण राक्षस निर्माण झाला, आणि राहूवर धावून गेला. त्या राक्षसाचे महाभयंकर रूप बघून राहू गर्भगळीत झाला, आणि त्याने शिवाच्या पायावर लोळणंच घेतली. भोलेनाथांनी दूत बनून आलेल्या राहू ला माफ केले आणि राहू ने तिथून काढता पाय घेतल्यावर महादेव परत ध्यानस्थ झाले.




पण इकडे त्या भयंकर राक्षसाची भूक वाढतच होती. त्याने भोलेनाथांना विचारले, की मी काय खाऊ? ध्यानात मग्न होत असलेल्या महादेवांनी सांगितले, की खा स्वतःलाच. देवाधिदेव महादेवाची आज्ञा शिरसावंद्य मानून राक्षसाने स्वतः ला पायापासून खायला सुरवात केली आणि खात खात त्याचे फक्त डोकेच उरले. तरीही त्याची भूक भागली नाही. महादेवाचे ध्यान संपल्यानंतर त्याला दिसले ते फक्त राक्षसाचे डोके. त्या राक्षसाच्या आज्ञा पालनावरभोलेनाथ प्रचंड खुश झाले. त्यांनी त्या डोक्याला नाव दिले कीर्तिमुख.

ह्या जगात कधीही न संपणारी गोष्ट म्हणजे मनुष्याचे पाप. अमर्याद अशी भूक असलेल्या किर्तीमुखाला देवाने काम दिले भक्तांची पापं खाण्याचे. होयसळेश्वर मंदिराचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भक्तांची पापं ही मंदिराच्या बाह्य भिंतींवरील कीर्तिमुखे गिळत असतात. जे कोणी वाईट विचार मनात घेऊन देवळात येतात, त्यांना हे कीर्तिमुख घाबरवून पळवून लावते. शिवाचा मनुष्याच्या पापे करण्याच्या क्षमतेवर पुरेपूर विश्वास. त्यामुळे किर्तीमुखाला अजूनही अगदी पोट भरून खायला मिळत आहे. एक दिवस त्या किर्तीमुखाचे पोट भरेल, पण...



## पुरातत्व संग्रहालय

मुसलमानी आक्रमणांच्या क्रूर लाटा एकामागून एक इथे येऊन आदळल्या, आणि सोन्याच्या द्वारकेशी पैजा करणाऱ्या सुंदर मंदिरांच्या पार ठिकऱ्या उडाल्या. होयसळेश्वर मंदिराच्या प्रांगणातच त्या उडालेल्या ठिकऱ्या एकत्र करण्यात आल्या, ज्याला आपण हळेबिडू संग्रहालय म्हणून ओळखतो. ह्या संग्रहालयात काही अतीशय सुंदर वीरगळ आणि होयसळ शिल्पकलेचे काही वपुष नमुने मांडून ठेवले आहेत.
हळेबिडू पुरातत्व संग्रहालय म्हणजे मूर्तिशास्त्र, मंदिर स्थापत्य शास्त्र आणि पुरातत्व अभ्यासकांसाठी एक मोठी पर्वणीच आहे. त्याचबरोबर तुमच्या आमच्या सामान्य लोकांसाठी सुद्धा इथे बरेच काही बघण्यासारखे आहे. हे संग्रहालय सकाळी नऊ ते पाच वाजेपर्यंत उघडे असते. तिकीट खिडकीवर अतिशय नाममात्र दरात तिकिटे उपलब्ध असतात. (ऑनलाईन तिकीट खरेदीसाठी ही लिंक वापरा). तिकीट खिडकीवरच ASI कडून प्रकाशित झालेली पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध असतात. ह्या संग्रहालयात बऱ्याच अर्धवट कोरलेल्या, किंवा काहीतरी चूक झालेल्या, पण सुंदर मूर्ती अतिशय

निगुतीने मांडून ठेवलेल्या आहेत. संग्रहालयाच्या प्रांगणात सप्त मातृका, मकर, प्रणय शिल्पे, पीठे, थोरल्या पाषाणातून अर्धवट कोरलेल्या खिडक्यांच्या जाळी, आणि सुंदर वीरगळ बघायला मिळतात.



संग्रहालयाच्या आत लाकूड आणि दगडांपासून बनवलेल्या बऱ्याच सुबक मूर्ती ठेवल्या आहेत. त्याचबरोबर लोखंडाचे एक प्रचंड भांडे, काही ताम्रपट आणि शिलालेखही आपल्याला बघायला मिळतात. संग्रहालयाच्या बाहेर, द्वारसमुद्र तलावा जवळ सुमारे चार मीटर उंचीची जैन तीर्थंकरांची सुंदर मूर्ती उभी करून ठेवलेली आहे. ती मूर्ती आणि त्याभोवतालची तितकीच सुंदर महिरप एकमेकांना पूर्णत्वाला नेतात. तलावाचे गहिरे पाणी आणि त्या बलाढ्य तीर्थंकरांची प्रशांत मुद्रा ह्यात काहीतरी काळाच्या पल्याड नेणारा गूढ दुवा आहे असे वाटत राहते. हा जलाशय आणि ते जैन मुनीराज. दोघांनी बरीच स्थित्यंतरे अनुभवली असणार. त्या शतकांच्या अनुभवातून येणाऱ्या पोक्तपणाची, स्थितप्रज्ञतेची छाप दोघांवर दिसते. तलावाचे गहिरे स्थिर पाणी, अन कयोत्सर्ग आसनामध्ये उभे ठाकलेले तीर्थंकर. पाहिल्याची उपमा दुसऱ्याला द्यावी अन दुसऱ्याची पाहिल्यालाच.



भग्न देवळातून उचलून आणलेल्या ह्या मूर्ती जरी आता सुरक्षित असल्या, तरी त्यांना काय काय बघावे लागले असेल ह्याची कल्पनाही करवत नाही. बुतशिकन घणांचे वार सोसून टिकून राहिलेल्या या मूर्तींना जर बोलता आले असते, तर त्यांनी संस्कृतीवर, माणसांवर झालेले अत्याचार, बेसुमार कत्तली, अमानुषता, नृशंसपणा भेसूर टाहो फोडत सांगितले असते. धर्म वगैरे गोष्टी काही काळासाठी बाजूला राहुद्यात. पण इतक्या सुंदरतेने, तन्मयतेने, रसिकतेने आयुष्यातील कित्येक वर्षे खर्चून घडवलेल्या कलाकृतींवर निर्घृणपणे घणाचे घाव घालणाऱ्यांपैकी एकाचाही हात एक माणूस म्हणून थरथरला नसेल? कसली उपमा द्यावी ह्या वृत्तीला? अमानुष, पाशवी का रानटी? रानटी जनावरे सुद्धा असे वागत नाहीत. मनुष्य न्हवेत, प्राणी न्हवेत, राक्षसच हे.

बेलूर आणि हळेबिडू ची नितांत सुंदर मंदिरे म्हणजे हिंदूंच्या प्रतिरोधाची प्रतीके. धर्मांध आक्रमणे समर्थपणे पचवून पुन्हा उभी राहणारी प्रतीके. अत्याचारांपलीकडे पोचून जणू त्रिविक्रमासारखी दशांगुळे पुरून उरणाऱ्या सनातन धर्माची प्रतीके. देवळांवरील उग्र नृसिंहासारखी प्रति-आक्रमणाची प्रतीके. महिषासुर मर्दिनी सारखी अस्मानी सुलतानीलाच लीलया अस्मान दावणारी प्रतीके. भारताच्या अस्मितेला उभारी देणारी प्रतीके.

होयसळांची, काकतीयांची बारीक कलाकुसर असलेली अक्षरशः मयसभेसमान वाटणारी मंदिरे मलिक काफूर ने जमीनदोस्त केली. हंपी येथे असलेला डौलदार लक्ष्मी नरसिंह मुस्लिम आक्रमकांनी फोडला. त्यांचे अत्याचार पराकोटीला पोचले, आणि मग सह्याद्री नावाचा खांब सरते शेवटी तडकला, अन त्यातूनच छत्रपती शिवाजी नावाचा नरसिंह प्रगट झाला. त्या हिंदूपती शिवनृसिंहाने अफजल रुपी हिरण्यकश्यपू ला आपल्या वाघनखांनी फाडले, आणि समस्त हिंदुस्थान त्या पराक्रमापुढे केवळ दिग्मूढ झाला. हिरण्य कश्यपू पासून सुरु होणाऱ्या आणि अफझलखानापाशी समाप्त होणाऱ्या ह्या प्रवासातले दोन महत्वाचे टप्पे आहेत बेलूर आणि हळेबिडू ची मंदिरे.

ह्या हर एक शिल्पातील कलात्मकता इतकी निर्दोष अन सजीव आहे की प्रत्येक शिल्पाचे निरीक्षण करण्यासाठी इथे वेळात वेळ काढून यावे लागते. इथे छीन्नीचा प्रत्येक घाव तुमची दाद मागत असतो. जसे जसे तुम्ही शिल्पांसमोर जास्ती घुटमळता, तसे तसे होयसळांची छिन्नी हातोडी तुमच्यासाठी नवा ठेका धरत असते. ही सर्व शिल्प बघताना, त्यातले मजेशीर बारकावे न्याहाळताना तुम्ही थबकता, स्वतः ला हरवून बसता. शिल्प बघता बघता तुमचेच एक शिल्प होऊन जाते, आणि ह्या मंदिराची हीच तर खरी जादू आहे.

# मंदिरे म्हणजे केवळ प्रार्थनास्थळेच होती का?



आजमितीस भारतात फक्त हिंदू मंदिरेच कर भरतात. तरीही बरेच ज्ञानी लोक म्हणतात, मंदिरे का बांधायची? शाळा किंवा रुग्णालये का बांधत नाहीत? या प्रश्नांनी माझ्या मनात कुतूहल जागृत केले, की हे इतके पराक्रमी, ज्ञानी आणि न्यायी राजे चढाओढीने मंदिरे का बांधत राहिले? पूर्वीच्या समाजात या इमारतींचे योगदान तरी काय होते?

ही मंदिरे म्हणजे केवळ प्रार्थनास्थळांपेक्षा बरेच काही होते. वायव्येकडून रानटी टोळधाड भारतात येण्यापूर्वी आपले राजे एकमेकात लढाया करीत. पण शेतीची जाळपोळ, शहरांचा विध्वंस, विद्यापीठांची नासधूस, निरपराध नागरिकांची बेसुमार कत्तल करून त्यांच्या मुंडक्यांचे मिनार रचणे, बायका मुलांवर अनन्वित शाररिक अत्याचार करून त्यांना गुलाम म्हणून विकणे, मंदिरांची तोडफोड करून गर्भगृहातील मूर्ती त्यांच्या प्रार्थना स्थळांच्या पायरींवर पुरणे असे अमानुष प्रकार ते करीत नसत. युद्धात मिळालेला विजय म्हणजे ईश्वरीय कृपा असे समजून, युद्ध संपल्यावर राज्यात माघारी

जाऊन हे राजे देवाचे सुंदर मंदिर बांधत. चेन्नकेशव मंदिर, वेरूळ चे कैलास मंदिर, किंवा चित्तोड किल्ल्यावरील विजयस्तंभ, अशी कितीतरी उदाहरणे म्हणजे एका राजाचे दुसऱ्या राजावरील विजयाची अजरामर बिरुदेच.

मंदिरे म्हणजे मोठाल्या आर्थिक घडामोडींची केंद्रे. बऱ्याच मंदिरांना मोठमोठाल्या जमिनी दान म्हणून मिळत. जवळपासच्या गावातील लोक ती जमीन कसत. राजाकडून, सरदाराकडून आणि सामान्य लोकांकडून मंदिरास ज्या देणग्या मिळत त्यातून पतपेढ्या चालवल्या जात. ह्यातून मंदिरांना आर्थिक उत्पन्न मिळत असे. ह्या उत्पन्न आणि देणग्यांमुळे मंदिरांकडे बरेच सोने नाणे, धान्य जमा होई. पूर्वीच्या काळी मन्दिरे म्हणजे सरकारी तिजोऱ्या असत. म्हणूनच परकीय आक्रमकांचा पहिला घाला मंदिरांवरच पडे.

दुर्मिळ हस्तलिखिते, मौलिक ग्रंथ ह्यांचे काळजीपूर्वक जतन करण्याची जागा म्हणजे मंदिरे. जेव्हापासून भारतात लेखनकला अस्तित्वात आली, तेव्हापासून आपले धर्मग्रंथ, शास्त्रे, आयुर्वेदीय संहिता, अर्थशास्त्रीय ग्रंथ, व्याकरण, तत्वज्ञान, काव्ये, आणि इतर बरेच ज्ञान टिकले आणि हजारो वर्षे टिकून आपल्यापर्यंत झिरपत आले ते देवळातील एकपाठी विद्वान, भूर्जपत्रे आणि शिलालेखांमुळेच.

अग्रहार, म्हणजेच मंदिराचा, आणि गुरुकुलाचा खर्च चालावा म्हणून लावून दिलेली उत्पन्नाची गावे. भारतीय गुरुकुल पद्धती जवळपास संपूर्णपणे मंदिरांच्याच आधारे टिकून होती. या शाळांनी हजारो वर्षांपासून चालत आलेल्या असंख्य परंपरा जिवंत ठेवल्या. मंदिरांच्या माध्यमातून अशा परंपरांना राजेशाही संरक्षण दिले जाई. इंग्रज येण्यापूर्वी भारतात गुरुकुल पद्धतीने शिक्षण दिले जात असे. खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, तत्वज्ञान, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, धर्म, योग, शारीरिक शिक्षण आणि युद्धशास्त्राचे धडे गुरुकुलात मिळत असत. ही गुरुकुलं मंदिरातर्फे चालविली जात.

इतकेच नाही, तर मंदिराच्या आवारात प्रसूतिशाला, आरोग्य गृह, राहण्याची व्यवस्था असलेले अद्ययावत रुग्णालय असे. बऱ्याचदा ह्या सेवा गरजूंना मोफत उपलब्ध असत. बहुतेक करून प्रत्येक मंदिरांमध्ये अन्नछत्र चालविली जात जिथे भक्तांना आणि भुकेल्यांना मोफत जेवण असे. मंदिर प्रांगणात प्रवाश्यांच्या सोयीसाठी धर्मशाला उभ्या केल्या जात.



देवळाचे प्रांगण म्हणजे तर गावकऱ्यांची हक्काची जागा. बारश्यापासून लग्नापर्यंतचे सर्व विधी ह्या प्रांगणातच पार पडत असत. देवळाची रंगशिळा म्हणजे लोकांचे कला सादर करण्याचे व्यासपीठ असे. गावातील निवडणूक, न्यायदान, अन्नछत्रे अशी बरीच कार्ये निर्विघ्नपणे देवाच्या सान्निध्यात होत असत. अगदी, नैसर्गिक आपत्तीं किंवा राजकीय अशांततेच्या वेळी ते आश्रयस्थान म्हणूनही वापरले जात असे. गावातील भटक्या जनावरांची काळजी मंदिराच्या गोशाळेत घेतली जात असे. थोडक्यात, ही उत्तुंग देऊळे-राउळे प्राचीन आणि मध्ययुगीन भारतवर्षामध्ये राहणाऱ्या लोकांच्या जीवनाचा अविभाज्य घटक होती.

## हळेबिडू परिसर

हळेबिडू हे होयसळेश्वर मंदिरासाठी प्रसिद्ध असले, तरीही इथे अजून दोन तीन ठिकाणे बघण्यासारखी आहेत. त्यातील पहिले म्हणजे जैन बसदी. १२ व्या शतकातील ही तीन जैन देवळे तीर्थंकरआदिनाथ, पार्श्वनाथ आणि शांतीनाथांना समर्पित असून खास होयसळ शैलीमध्ये बांधली गेली आहेत. ही देवळे होयसळेश्वर मंदिराची समकालीन होत. इथे प्रांगणात अनेक शिलालेख सापडतात. तसेच एक हुरिकेरे कल्याणी नावाची सुंदर पुष्करणी सुद्धा आवर्जून बघण्यासारखी.



कळस असलेले केदारेश्वर मंदिर, रिचर्ड बॅनर ओकेली, १८५६

## केदारेश्वर मंदिर



त्याच रस्त्यावर द्वारसमुद्र तलावाच्या काठी श्री केदारेश्वराचे सुंदर मंदिर आहे. होयसळ राजा वीर बल्लाळ दुसरा आणि त्याची महाराणी केतलादेवी ह्यांनी हे मंदिर बांधून घेतले. होयसळ शैली प्रमाणेच हे मंदिर पाच फुटी जगती वर उभे असून त्याच्या भिंती कंगोरेबद्ध आहेत. मंदिरांच्या बाह्य भिंतीवर सुंदर शिल्पे कोरलेली आहेत. मंदिरास तीन गर्भगृहे असून त्यात मूर्ती नसल्याने हे देऊळ भलतेच भकास वाटते.अंधारे गर्भगृह, मंडपांमुळे एकेकाळी गजबज असणारे हे देऊळ आता वटवाघुळांचे निवासस्थान झाले आहे.

थोडेसे आडवाटेला असल्याने ह्या मंदिरात फारशी वर्दळ नसते. मंदिर अंतर्बाह्य बघावे, आणि प्रांगणातल्या बाकड्यावर पाठ टेकवून शांतपणे बसावे. इथे ना टुरिस्ट बसेस ची वर्दळ, ना शहाळी आणि पुस्तके विकणाऱ्या पोरांचा गोंगाट. इथे बगळ्यांनी शाळा मांडलेली असते. गावकऱ्यांच्या हिरव्यागार भात शेती अगदी देवळाच्या बाह्य भिंतीला येऊन भिडलेल्या असतात. वाऱ्याची झुळूक द्वारसमुद्र तलावावर तरंग उमटवत असते, आणि देवळाला वेढणाऱ्या माडांना डुलकीतून जागे करीत असते. हळेबिडू चे होयसळेश्वर मंदिर बघितल्या नंतर येणार शिणवटा आडवाटेवरचा केदारेश्वर हा असा दूर करतो.



हळेबिडू गाव छोटे असल्याने इथे फारश्या सोयी उपलब्ध नाहीत. बहुतेक करून मुक्कामी राहणारे प्रवासी बेलूर मध्ये राहतात. परंतु, होयसळेश्वर मंदिराच्या पलीकडेच कर्नाटक राज्य पर्यटन विभागाचे (KSTDC) शांतला नावाचे प्रशस्त हॉटेल बांधलेले आहे, जिथे जेवायची व राहण्याची उत्तम सोय होते. (हॉटेल चे बुकिंग तुम्ही इथून करू शकता.) हळेबिडू गाव बेलूर पासून साधारण २५ तर बेंगळुरू पासून साधारण २१० किमी वर आहे. स्वतः ची गाडी आणि पुरेसा वेळ नसल्यास तुम्ही ह्या मंदिरांना एक दिवसाची धावती भेट देऊ शकता.

बेंगळुरू च्या यशवंतपुरा बस स्थानकातून सकाळी साडेसहा वाजता (KSTDC) ची वातानुकूलित बस निघते, जी श्रवणबेळगोळ, बेलूर आणि हळेबिडू ची सहल करून परत रात्री दहा वाजता तुम्हाला यशवंतपुरा ला आणून सोडते. (बुकिंग तुम्ही इथून करू शकता.) ९५० रुपये तिकीट असलेल्या वातानुकूलित बस बरोबरच सोबतीला गाईड असतो. त्यामुळे जर गाडी हाताशी नसल्यास ह्या बसचा जरूर विचार करावा. हे ९५० रुपये तुमचे जीवन समृद्ध करतील ह्यात शंका नसावी.

# संदर्भसूची

1. A Historical Atlas of Karnataka, H. Shashidhar and N. Shreenivasa Murthy, Directorate of Census Operations, Karnataka.
2. The Hoysalas, A Medival Indian Royal Family, By J. Ducan M. Derrett, Oxford Universty Press, 1957
3. South India and Her Muhammadan Invaders, S. Krishnaswami Aiyangar, Oxford University Press, 1921
4. The Hoysala Vamsa, William Coelho, Indian Historical Research Institute, ST. Xavier's College, Mumbai, 1950
5. The Hoysala Legacy: Belur, Halebidu, Somnathpura, Kamalika Bose and George Michell, Jaico Publishing House, Mumbai 2019
6. शिवमूर्तये नम:, डॉ. गो. बं. देगलूरकर, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१४
7. मंदिर कसे पाहावे, डॉ. गो. बं. देगलूरकर, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१९
8. भारतीय मूर्तिशास्त्र, डॉ. नी. पु. जोशी, प्रसाद प्रकाशन, २०१३

दुसर्याने लिहिलेले स्वत:च्या नावावर खपवणे म्हणजे निव्वळ भूरटेगिरी. कॉपी पेस्ट करणे सोपे असते, पण त्याहूनही सोपे असते जसेच्या तसे शेयर करणे. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांपर्यंत ही माहिती मूळ लेखकाच्या नावासकट पोचवा ही विनंती. पुस्तक आवडले असल्यास मित्रपरिचितांना नक्की फॉरवर्ड करा. आम्हाला सोशल मीडिया वर फॉलो करा.